## प्रकरण सहावे

# डांग जिल्ह्यातील लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या


६. १. प्रस्तावना

६. २. लोकप्रथेचे स्वरूप

६. ३. लोकभ्रमाचे स्वरूप

६. ४. लोकश्रद्धेचे स्वरूप

६. ५. लोकविद्येचे स्वरूप

६. ६. डांग जिल्ह्यातील लोकप्रथा

- ६. ६. १. खाण्याविषयी लोकप्रथा
- ६. ६. २. गोंदण्याविषयी लोकप्रथा
- ६. ६. ३. होळीविषयी लोकप्रथा
- ६. ६. ४. शेतीविषयी लोकप्रथा
- ६. ६. ५. देवतांविषयी लोकप्रथा
- ६. ६. ६. यात्रा-उत्सवांविषयी लोकप्रथा
- ६. ६. ७. विवाहाविषयी लोकप्रथा
- ६. ६. ८. जन्म-मृत्यूविषयी लोकप्रथा

६. ७. डांग जिल्ह्यातील लोकभ्रम

- ६. ७. १. भूताविषयी लोकभ्रम
- ६. ७. २. चेटकिणीविषयी लोकभ्रम
- ६. ७. ३. पशु-पक्ष्यांविषयी लोकभ्रम
- ६. ७. ४. देवतांविषयी लोकभ्रम
- ६. ७. ५. जीवात्म्यांविषयी लोकभ्रम
- ६. ७. ६. भगतांविषयी लोकभ्रम
- ६. ७. ७. गरोदरपणातील लोकभ्रम
- ६. ७. ८. बाळाविषयी लोकभ्रम
- ६. ७. ९. दृष्ट काढण्याविषयी लोकभ्रम
- ६. ७. १०. इतर लोकभ्रम

६. ८. डांग जिल्ह्यातील लोकश्रद्धा

- ६. ८. १. देवतांविषयी लोकश्रद्धा
- ६. ८. २. मृतात्म्यांविषयी लोकश्रद्धा
- ६. ८. ३. टाक आणि चिऱ्यांविषयी लोकश्रद्धा
- ६. ८. ४. पशु-पक्ष्यांविषयी लोकश्रद्धा
- ६. ८. ५. शेतीविषयी लोकश्रद्धा

६. ८. ६. पायाळू व्यक्तीविषयी लोकश्रद्धा
६. ८. ७. इतर लोकश्रद्धा
६. ९. डांग जिल्ह्यातील लोकविद्या
६. १०. समारोप
संदर्भ ग्रंथ
साधन व्यक्त

# प्रकरण सहावे

# डांग जिल्ह्यातील लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या

---

## ६. १. प्रस्तावना:

लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या ह्या संकल्पनांचा विचार करता असे लक्षात येते की, त्या एकमेकींत इतक्या गुंतलेल्या आहेत की त्यांना एकमेकींपासून वेगळे करणे खूप कठीण आहे. काहीवेळा ते अशक्यही होऊन बसते. ह्या संकल्पना एकमेकींना पूरक आहेत, एकमेकींवर अवलंबून आहेत. त्यामुळेच त्यांना वेगळे करणे कठीण आहे. एक एक संकल्पना व्यापकतेच्या दृष्टीने विशाल आहे. या व्यापकतेत इतर संकल्पनाही सामावलेल्या असतात. नुसता लोकप्रथांचा जरी विचार केला तरी असे लक्षात येते की, अनेक लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या यांचा समावेश लोकप्रथेत होतो. कारण या सगळ्या लोकभ्रमांमागे, लोकश्रद्धांमागे किंवा लोकविद्यांमागे कुठलीतरी लोकप्रथा, लोकपरंपरा पाहायला मिळते. मुळात संपूर्ण लोकसाहित्य हे लोकप्रथेने, लोकपरंपरेनेच पुढे आलेले असते.

लोकविद्येचा विचार केला तरी असेच दिसते. लोकसाहित्यालाच काही अभ्यासकांनी 'लोकविद्या' हे नाव द्यावे असे सुचवले होते. कारण लोकसाहित्याप्रमाणे लोकविद्या हीही संकल्पना व्यापकतेच्या दृष्टीने विशाल आहे. त्यामुळे लोकविद्या या संकल्पनेतही लोकप्रथा, लोकश्रद्धा आणि लोकभ्रम यांचा समावेश होतो. त्याप्रमाणात लोकभ्रम आणि लोकश्रद्धा ह्या संकल्पना संकुचित अर्थाने वापरता येतात. परंतु त्यातही लोकभ्रम कोणते आणि लोकश्रद्धा कोणत्या हे ठरविणे अतिशय कठीण असते. कारण एखादी लोकश्रद्धा एखाद्या ठिकाणी लोकभ्रम म्हणून पुढे येते तर दुसऱ्या ठिकाणी ती येत नाही. एखाद्या कालखंडातील एखादा लोकभ्रम पुढील कालखंडात लोकश्रद्धा म्हणून पुढे येते. म्हणूनच ह्या संकल्पना अतिशय गुंतागुंतीच्या असून त्या एकमेकींवर अवलंबून आहेत असेच म्हणावे लागते.

प्रस्तुत प्रकरणात लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या या संकल्पनांचे स्वरूप आणि डांग जिल्ह्यातील त्यांचे महत्त्व, विस्तार व प्रभाव यांचा अभ्यास केला गेला आहे. ह्या संकल्पना स्वतंत्ररीत्या अभ्यासल्या गेल्या असल्या तरी त्यात काटेकोरपणा असेलच असे नाही.

## ६. २. लोकप्रथेचे स्वरूप:

मानवाची गणना प्राण्यांमध्ये होत असली तरी तो इतर प्राण्यांहून वेगळा आहे, हेही त्याचवेळी सांगितले जाते. बहुतेक प्राणी कळपाने राहण्यास पसंत करतात. मानवही कळपानेच राहण्यास पसंत

करतो. परंतु त्याच्या कळपाला कळप न म्हणता ‘समाज’ म्हटले जाते. हा समाज काही नियमांनी, काही अटीतटींनी बांधलेला असतो. ह्या अटीतटी किंवा नियम समाजाचा घटक असलेला मानव अनुकरणाने कळत नकळत आत्मसात करत असतो. त्याचे पालन करण्याचा कसोशीने प्रयत्न करत असतो. जो या नियमांचे पालन करत नाही. जो नियमांना धरून चालत नाही. तो समाजातून बाजूला फेकला जातो. त्याला समाज तुच्छतेने पाहतो. त्याची टिंगलटवाळी करतो.

हे नियम किंवा अटी लोकसमूहात लोकपरंपरेने, लोकरूढीने, लोकप्रथेने, रीतीरीवाजाने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत आलेले असतात. त्यात अनेक वेळा बदल होऊन नाविन्याचा स्वीकार केला जातो. या प्रथा-परंपरेत नाविन्याला आपल्यात सामावून घेण्याची प्रचंड क्षमता असते. या क्षमतेमुळेच अनेक वेळा नाविन्याचा स्वीकार करूनही रूढी परंपरेत फारसा फरक पडल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे एकाचवेळी स्थिरता आणि परिवर्तन असे द्वंद्वात्मक धोरण यामध्ये दिसून येते.

“मानवी जीवनात पिढ्यान् पिढ्यांपासून चालत आलेल्या आचारांच्या व विचारांच्या रुळलेल्या सवयी म्हणजे रूढी. किंवा प्राचीन काळापासून लोकजीवनात विशिष्ट प्रसंगी किंवा क्षणी रूढ झालेल्या काही सवयी आणि त्या साजऱ्या करण्याचे पूर्वजांपासून चालत आलेले विधी म्हणजे रूढी, परंपरा, चालीरीती होत.”[१] यालाच आपण लोकप्रथा असेही म्हणतो.

भारतावर अनेक परकीय आक्रमणे झाली. त्यात भारतीय संस्कृतीला अनेक तडे गेले. त्यातही प्रामुख्याने मुस्लीम राजवट आणि इंग्रजी राजवट यांचा मोठाच धक्का भारतीय संस्कृतीला बसला. या परकीय संस्कृतींचा येथील मूळ संस्कृतीवर अनेकांगाने परिणाम झाल्याचे दिसून येते.आज इंग्रजी वळणाचे आणि फारसी, अरबी वळणाचे अनेक शब्द मराठीने आपल्यात सामावून घेतले आहेत. हे याचेच उदाहरण म्हणता येईल. असे असले तरी मराठीने तिचा मराठीपणा सोडलेला दिसत नाही.

लोकप्रथेचे पालन आणि परिवर्तन वैयक्तिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर घडत असते. पूर्वीचे लग्नाचे स्वरूप निराळे होते आणि आजचे निराळे आहे. जुन्या जाणत्या माणसांकडून पूर्वीच्या त्यांच्या लग्नाच्या प्रसंगांच्या कथा ऐकल्या की, त्यातील कितीतरी विधी आज नामशेष झाल्यासारखे वाटते. पूर्वी त्यांचे लग्नविधी पंधरा पंधरा दिवस चालायचे. त्यात अनेक बदल होत होत हा विधी तीन ते चार दिवसांवर येऊन ठेपला होता. आणि आतातर कोरोना या महामारीमुळे हा विधी अगदी एका तासाच्या आत काही मोजक्याच माणसांच्या उपस्थितीत आटोपला जातो. नुसते दोन ते तीन वर्षांपूर्वीचे लग्नविधी पाहिले आणि आजचे लग्नविधी पाहिले आणि त्यांची तुलना केली तर कितीतरी तफावत या दोन्ही विधींमध्ये दिसून येते. आजच्या लग्नविधीतून नाचगाणे कमी झाले, लोकांची वर्दळ कमी झाली, चार दिवसांचा वेळ एका तासात सामावला गेला, अनेक नातेवाईकांनी पाठ फिरवली, देणे घेणे संपुष्टात आले, पैशांचा खर्च कमी झाला, काही नीतीनियम मोडले तोडले गेले. असे अनेक बदल या विवाह विधीत दिसून आले. हा आतापर्यंतचा विवाह विधीत झालेला सर्वात जलद आणि मोठा बदल म्हणता येईल. याआधी विवाह विधीत झालेला बदल हा चटकन डोळ्याला दिसून आला नव्हता. मात्र यावेळी हा बदल सर्वांना जाणवला, सर्वांनी अनुभवला. असे असले तरीही विवाह विधीचा मूळ हेतू बाजूला सारला गेला नाही. हा मूळ हेतू म्हणजे वधू-वराचे लग्न लावून त्यांना एकत्र आणणे, त्यांना पती-पत्नी म्हणून समाजमान्यता देणे. समाजातील मानव रूढी प्रथेला घट्ट

चिकटून असतो हे यावरून म्हणता येईल. येणाऱ्या दिवसांमध्ये कोरोनाचा प्रभाव कमी झाल्यास परत तीन ते चार दिवसांचे विवाह सोहळे साजरे केले जाऊ शकतात. परंतु ते येणारा काळच ठरवेल.

रूढी, प्रथा, परंपरा या प्रत्येक समाजाच्या वेगळ्या असतात. त्यामुळे त्याला प्रादेशिकतेचे स्वरूप काहीवेळा आलेले दिसते. त्या त्या प्रदेशात, त्या त्या समाजात, त्या त्या जाती जमातीत रूढी प्रथेत थोडेफार बदल झालेले निदर्शनात येते. हे बदल ते ते समाज गट कोणत्या समाज गटाशी घनिष्ठ संबंध ठेवतात त्यावर ते अवलंबून असते. उदाहरणार्थ गुजरात राज्याच्या सीमेवरील मराठी समाज गटावर गुजरात राज्याचा प्रभाव पडल्याने तेथील समाज गटाच्या रूढी प्रथेवरही गुजरात राज्याचा प्रभाव स्वाभाविकपणेच दिसून येईल. तसेच कर्नाटक, मध्यप्रदेश किंवा इतर कोणत्याही राज्याच्या सीमेवर असे प्रभाव रूढी प्रथेवर पडल्याचे दिसून येईल. कोणताही समाज गट बाजूच्या समाज गटातून काहीतरी सतत घेत आणि देत असतो, शिकत आणि शिकवत असतो. याचा कळत नकळत एकमेकांवर प्रभाव पडतो. यातून सतत परिवर्तन घडत असते. म्हणजेच कोणतीही प्रथा सतत परिवर्तनशील असूनही तिच्यात इतिहासातील अनेक खुणा चिकटून असतात. यामुळेच तिला आपण प्रथा, रूढी, परंपरा असे म्हणतो. या प्रथा, परंपरा खाण्याच्या, राहण्याच्या, कपड्यांच्या, दागदागिन्यांच्या, बोलण्याच्या, शेतीच्या, घराच्या, नदी-नाल्याच्या, डोंगरांच्या, देव-दैवतांच्या, यात्रा-उत्सवांच्या किंवा अनेक धार्मिक विधींच्या बाबतीत असू शकतात.

**६. ३. लोकभ्रमाचे स्वरूप:**

आपण अनेक लोकप्रथांचे आकलन करून घेतले. "परंपरेने चालत आलेले सगळेच लोकभ्रम नसतात. सगळ्याच समजुती, अंधश्रद्धा नसतात. म्हणून पारंपरिक चालत आलेले ते त्याज्य, अशास्त्रीय, अवैज्ञानिक असे मानणे हे चुकीचे ठरते."[२] ह्या सगळ्याच लोकप्रथा लोकभ्रम नसतात. मात्र काहीवेळा त्यांच्यातील वेगळेपणाही दाखवता येत नाही. इतक्या त्या गुंतागुंतीच्या असतात. त्यामुळेच 'अंधश्रद्धा निर्मुलन समिती'चे कार्यकर्ते अशा लोकभ्रमांना कडाडून विरोध करतात. अशावेळी ज्या लोकसमजुतीचा म्हणजेच लोकभ्रमाचा विरोध केला जातो त्या लोकभ्रमाकडून मात्र आपली ठोस बाजू नीटपणे मांडता येत नाही. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे हे लोकभ्रम अनुभवाधिष्ठित असतात. कोणत्याही अनुभवाचा पुरावा आपल्याला सहजपणे केव्हाही आणि कुठेही देता येत नाही. त्याला एक विशिष्ट वेळ, काळ, स्थळ आणि परिस्थिती निर्माण व्हावी लागते. अशी परिस्थिती निर्माण होताच तो अनुभव पुन्हा प्राप्त होतो. आणि तेव्हापासून ती एक लोकप्रथा तयार होते. ही लोकप्रथा काही वेळा लोकभ्रम म्हणून पुढे येते किंवा लोकश्रद्धा म्हणूनही पुढे येऊ शकते. हा अनुभव चांगला किंवा वाईटही असू शकतो. हे लोकसंचित पिढ्यानपिढ्यांचे असते. ते कोणा एका व्यक्तीचे नसते. पिढी दर पिढी ते झिरपत आलेले असते.

हे लोकभ्रम भीतीपोटी निर्माण झालेले असतात किंवा काही वेळा सुफलानाच्या आशेपोटीही निर्माण झालेले असतात. उदाहरणार्थ- खेड्यापाड्यांत भूताखेतांविषयी अनेक लोकभ्रम निर्माण झालेले आहेत. परंतु अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या एखाद्या कार्यकर्त्याने जर सांगितले की, मी तुला दोन लाख रुपये देतो. तू मला एक गुटगुटीत लहानसे भूत पकडून दाखव, तर ते शक्य नाही. अशावेळी तो अनेकांचा आणि अनेक पिढ्यांचा अनुभव खोटा ठरून तो एक लोकभ्रम म्हणून पुढे येतो. असे

अनेक लोकभ्रम समाजात प्रचलित असतात. त्याला कमीअधिक लोकांची मान्यताही प्राप्त झालेली असते. ही मिळालेली मान्यताच अनेक पिढ्या अशा लोकभ्रमांना पुढे घेऊन चालते.

विज्ञानाच्या प्रगतीमुळे आज अनेक लोकभ्रम मागे पडत चालले असले तरी ते पूर्णपणे नाहीसे झाले आहेत असे मात्र म्हणता येत नाही. बुद्धिनिष्ठ किंवा बुद्धीजीवी लोक अशा लोकभ्रमांना थारा देत नसले तरी त्याहून मोठा जनसमुदाय आज खेड्यापाड्यांत, वाडीवस्त्यांत विखुरलेला आहे आणि तो अशा लोकभ्रमांचे कसोशीने पालन करतांना दिसत आहे. दोघांमध्ये फरक इतकाच की, बुद्धीजीवी लोक या लोकभ्रमांना आपल्या बुद्धीच्या कसोटीवर तारून, पारखून बघतात आणि सामान्यजन या लोकभ्रमांना आपल्या मनाच्या व्यापक दृष्टीत सामावून घेतात. बुद्धी हे मन असू शकत नाही. बुद्धी ही मनाचा एक घटक आहे. मनाची व्यापकता खूप मोठी आहे. मनाने संपूर्ण जीवन व्यापलेले आहे मात्र बुद्धीने संपूर्ण जीवन व्यापलेले नाही. याच कारणाने लोकभ्रम आजही जनमानसात प्रचलित आहेत. लोकभ्रम तर्कसंगत असोत वा नसोत, सत्य असोत वा नसोत, बुद्धीला पटणारे असोत वा नसोत, बुद्धीजीवींना पटणारे असोत वा नसोत. मन भयमुक्त होत नाही तोपर्यंत मनावर त्यांचे अधिराज्य कायम राहणार आहे.

### ६. ४. लोकश्रद्धेचे स्वरूप:

'लोकश्रद्धा' या शब्दाचे लोक आणि श्रद्धा असे विघटन करता येते. ज्याप्रमाणे लोकसाहित्य, लोककथा, लोकगीत, लोकप्रथा, लोकपरंपरा, लोकविद्या, लोकभ्रम इत्यादी शब्दांचे विघटन करता येते. यातील प्रत्येक शब्दातील 'लोक'ची संकल्पना आणि व्यापकता सारखीच असून त्याची स्पष्टता दुसऱ्या क्रमांकाच्या प्रकरणात केली आहे. येथे 'श्रद्धा' या शब्दाचा विचार करता, "श्रद्धा हा शब्द श्रत्+धा या धातूपासून तयार झाला आहे. श्रतचा अर्थ Belief किंवा Faith असा होतो आणि धा म्हणजे धारण करते. ज्या कल्पनेवर दृढ विश्वास असतो अशा भावनेलाच श्रद्धा म्हणतात."[३] "श्रत् हे सत्याचे नाव आहे. हे सत्य जेव्हा बुद्धी धारण करते तेव्हा त्याला आपण श्रद्धा असे म्हणतो. धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांत अविपर्यय स्वरुपात 'हे असेच आहे' अशी जी बुद्धी उत्पन्न होते तिलाच दिव्य भावस्वरुपा श्रद्धा असे म्हणतात."[४] येथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे ज्या व्यक्तीच्या ठायी एखाद्या धारणेविषयी, प्रथेविषयी, परंपरेविषयी मनामध्ये दृढ विश्वास उत्पन्न होतो तेथे श्रद्धा उत्पन्न होते. ही श्रद्धा सत्याधारित असून सदसदविवेकबुद्धीला पटणारी असते.

समाजात अनेक मतप्रवाह असतात. प्रत्येक मतप्रवाहाची दिशा ठरलेली असून ती एकमेकांपासून भिन्न असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदसदविवेकबुद्धी नेमकी कोणत्या समाजाकडे असते असा प्रश्न उपस्थित केला तर अनेक आरोप प्रत्यारोप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उदाहरण म्हणून साहित्याचे घेता येईल. साहित्यामध्ये दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, लोकसाहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य असे अनेक मतप्रवाहातून निर्माण झालेले साहित्यप्रकार पाहायला मिळतात. त्या त्या साहित्य प्रवाहातील साहित्यिक आपल्या सदसदविवेकबुद्धीने त्या त्या साहित्याचे महत्त्व पटवून देतात. कारण त्या साहित्यिकाचा त्याच्या साहित्यावर दृढ विश्वास असतो. आणि त्याला त्यातील सत्यता पटलेली असते. हीच सत्यता दुसऱ्या साहित्य प्रवाहातील

साहित्यिकाला पटेलच असे नाही. त्यामुळे मनुष्यप्राणी हा सर्वार्थाने बुद्धिशाली, बुद्धिमान आहे असे धरून चालायला हरकत नसावी.

यादृष्टीने लोकश्रद्धा या दोन प्रकारच्या असतात असे आपण म्हणू शकतो. काही सत्यावर आधारित असतात तर काही असत्यावर आधारित असतात. ज्या सत्यावर आधारित असतात त्या श्रद्धांना संगती असते, तर्क असतो, तथ्य असते तर ज्या असत्यावर आधारित असतात त्या श्रद्धांना संगती नसते, तर्क नसतो, तथ्य नसते. येथे हेही लक्षात घेतले पाहिजे की, कोणतीही श्रद्धा सत्य किंवा असत्य ठरविण्यासाठी त्या त्या जनसमुदायाचा आणि त्या त्या कालखंडाचा विचार करावा लागतो. एखादा जनसमुदाय एखादी श्रद्धा तर्कसंगत मानेल तर दुसरा ती मानेलच असे नाही. तसेच एखाद्या कालखंडात एखादी श्रद्धा तर्कसंगत मानली जाईल तर दुसऱ्या एखाद्या कालखंडात तीच श्रद्धा तर्कसंगत मानली जाणार नाही. यामुळेच एखादी श्रद्धा एखाद्या जनसमुदायाला अंधश्रद्धा वाटेल तर तीच श्रद्धा दुसऱ्या एखाद्या जनसमुदायाला अंधश्रद्धा वाटणार नाही. हे ज्याच्या त्याच्या विचार आणि विश्वासावर अवलंबून आहे. आज आदिवासींच्या अनेक प्रथा, परंपरांवर अंधश्रद्धा म्हणून बोट ठेवले जाते. उदाहरण म्हणून डोंगऱ्यादेवाचा उत्सव विचारात घेता येईल. डोंगऱ्यादेवाच्या उत्सवात आदिवासी अनेक प्रकारचे अलौकिक खेळ करतात. हे सर्व खेळ डोंगऱ्यादेवाला प्रसन्न करण्यासाठी खेळले जातात. त्यात प्रामुख्याने अंगाऱ्यावर चालणे किंवा नाचणे, अंगारे (विस्तव, निखारे) दीर्घकाळ हातात घेऊन राहणे, अंगारे खाणे, बांबूच्या काठीचा मार खाणे, चाबकाचा जोरजोरात मार खाणे, जमिनीवर उलट्या सुलट्या कोलाट्या खाणे, अग्नीशी खेळणे, करवंद किंवा बाभळीसारख्या अणकुचीदार काट्यांना अंगाखांद्यावर खेळवणे आणि त्या काट्यांवर आरामात झोपणे असे अनेक असामान्य खेळ ते सहजपणे खेळतात. हे खेळ करत असतांना त्यांच्या मनामध्ये कुठल्याही प्रकारची भीती नसते. ते पूर्ण समर्पण भावाने हे खेळ खेळतात. त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर भीती ऐवजी समाधान प्रकर्षाने दिसून येते. इतर पुढारलेल्या समाजातील माणसांना हे खेळ खेळणे कदापि शक्य वाटत नाही. त्यामुळे ते सरळ सरळ त्यावर टीका करतात. त्या खेळांना अंधश्रद्धा म्हणून निकाली लावतात. यात प्रामुख्याने 'अंधश्रद्धा निर्मुलन समिती'चे कार्यकर्ते आघाडीवर आहेत. ते म्हणतात, "अंगात येणे हे सुप्त मनामध्ये जे अनेक विचार, भावना, परस्परविरोधी मते, ताणतणाव साठवलेले असतात, त्यामुळे घडून येते. याची कल्पना इतरांनाच नव्हे, तर त्या व्यक्तीलाही नसते. सुप्त मनातील भावनांना वाट मोकळी करून देण्याची ही कृती बहुतांशी वेळा जाणीवपूर्वक केलेली नसते, तर आपोआप घडत असते. हा सौम्य स्वरूपाचा मानसिक आजार आहे."[५] अंनिसचे कार्यकर्ते अंगात भूत, देव/देवी, मृतात्मा, भगत, गुरु येणे किंवा झपाटणे याला मानसिक आजार म्हणतात. हे त्यांच्या अनेक वैचारिक साहित्यावरून म्हणता येते.

श्रद्धा म्हणजे विश्वास, निष्ठा, भाव, भक्तीभाव, आस्था होय. ही श्रद्धा कोणावर तरी टाकली जाते, कोणाशी तरी संबंधित असते, कोणाशी तरी एकरूप झालेली असते. मग ते कोणीही आणि काहीही असू शकते. जसे देव, दानव, मानव, पशु, पक्षी, झाडे, नदी, डोंगर,जल, दगड इत्यादी. ज्याचा भाव ज्या वस्तूशी निगडीत असतो ती त्याची त्या वस्तूसंबंधीची श्रद्धा. अशा अनेक श्रद्धा सांगता येतात.

## ६. ५. लोकविद्येचे स्वरूप:

लोकविद्येचे स्वरूप पाहतांना तिच्या व्यापकतेचा विचार करावा लागतो. विद्या म्हणजे शिक्षण, ज्ञान, विद्वत्ता असा सर्वसाधारण अर्थ काढता येतो. लोकसाहित्याच्या दृष्टीने शिक्षणाचा किंवा लोकशिक्षणाचा विचार केला तर त्यामध्ये लोककथा, लोकगीत, म्हणी, उखाणे, लोककला, लोकनृत्य इत्यादींचा समावेश होतो. त्यामुळेच Folklore या शब्दाचा समर्पक आशय व्यक्त करण्यासाठी कै. दत्तो वामन पोतदार यांनी लोकसाहित्याऐवजी 'लोकविद्या' हा शब्द सुचविला. याला समर्थक म्हणून डॉ. रा. चिं. ढेरेंसारखे काही अभ्यासक लाभलेअसले तरी तो शब्द रूढ होऊ शकला नाही. काहीही असले तरी लोकविद्या हा शब्द व्यापकतेच्या दृष्टीने विशाल आहे. परंतु येथे ही व्यापकता लक्षात न घेता फक्त वनौषधींविषयी असलेले शिक्षण किंवा विद्या लक्षात घेतली आहे. यालाच आपण लोकवैद्यक असेही म्हणू शकतो.

लोकवैद्यकाला शतकानुशतकाची परंपरा असलेली दिसून येते. ही परंपरा जोपासणारे वैद्य आजही ग्रामीण भागात, खेड्यापाड्यात दिसून येतात. मुळात हजारो वर्षांपासून माणसाचा संबंध जंगलांशी आलेला आहे. या जंगलातीलच फळे, फुले, पाने, कंदमुळे, डिंक, मध अशांवर आपला उदरनिर्वाह केलेला आहे. या उदरनिर्वाहाच्या काळात त्याला आलेले अनेक अनुभव तो संग्रहित करत गेला आणि त्यातून, त्याला झालेल्या आकलनातून वनस्पतींचे अनेक गुण-दोष तो आपल्या मेंदूमध्ये साठवत गेला. येणाऱ्या पिढीला आपल्या वाणीने सांगत गेला. डोळ्याने दाखवत गेला. हेच हजारो वर्षांचे वैद्यक ज्ञान आजही काही वैद्यांनी जिवंत ठेवलेले आहे.

आज विज्ञान युगातही ह्या वनौषधींचे महत्त्व कमी झालेले नाही. असे असले तरी हे वैद्यक ज्ञान किंवा विद्या आज विरळ होतांना दिसत आहे. जणू हीच भीती आज अनेक वैज्ञानिकांना सतावत आहे. म्हणून काही ठिकाणी ग्रामीण भागातील वैद्यांना मोठ्या शहरात बोलावून शिबिरांचे आयोजन केले जाते. त्यांना मानधनाचे आमिष दाखवून, काही प्रमाणपत्रे देऊन त्यांच्याकडे असलेली विद्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो आहे. यावरूनही या विद्येचे किती महत्त्व आहे हे लक्षात येते.

## ६. ६. डांग जिल्ह्यातील लोकप्रथा:

प्रत्येक मानवसमूह आपापल्या प्रथा, परंपरा जोपासतांना दिसून येतो. ह्या प्रथा, परंपरा चांगल्या किंवा वाईट याची तो शहानिशा करत बसत नाही. तो पिढ्यानपिढ्या रुळत आलेल्या वाटेवरून चालायला पसंत करतो. ही रुळलेली वाट सरळ आहे की वाकडी, सौम्य आहे की कठीण, काट्यांतून आहे की फुलांतून, सुखाची आहे की दुःखाची हे तो कधीही पडताळून पाहात नाही. पूर्वजांनी दाखविलेली वाट तो कधीही सोडत नाही. या वाटेलाच आपण प्रथा किंवा परंपरा म्हणू शकतो.

### ६. ६. १. खाण्याविषयी लोकप्रथा:

डांग जिल्ह्यातील आदिवासींकडून कळत नकळत सहजपणे अनेक लोकप्रथांचे पालन केले जाते. ज्यामध्ये आपण म्हणू शकतो की, जेवणाच्या वेळी कोणी व्यक्ती समोर आली तर जेवणाऱ्याच्या तोंडून लगेच शब्द निघतात की, 'खावला ये.', 'खायनास का नी?' म्हणजे जेवायला ये, जेवला की

नाही? असे सहज बोलले जाते. यालाही आपण एक प्रथा म्हणून पाहू शकतो. जी बहुतेकदा सर्वच खालच्या वरच्या, गरीब श्रीमंत किंवा पुढारलेल्या समाजामध्येही पाहायला मिळते. परंतु काही प्रथा या त्या त्या प्रदेशापुरत्या किंवा जाती जमातीपुरत्याच मर्यादित असतात.

घराच्या पुढच्या किंवा मागच्या बाजूला असलेल्या वाड्यातून (वाड्याचा परिचय प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात करून दिला आहे.) पावसाळ्यात ज्या भाज्या निघतात त्यांचे सेवन करण्याआधी त्यांची नागपंचमी किंवा पोळा या सणाला पूजा केली जाते. त्यामध्ये दोडका, गिलका, पावसाळी काकडी (डांगी बोलीमध्ये वाळूक), मका इत्यादींचा समावेश करता येईल. या सगळ्यांची नागपंचमी किंवा पोळा या सणाच्या दिवशी पूजा केली जाते, गावदेवाच्या म्हणजे मारुतीच्या चरणी अर्पण करून मगच त्यांचे सेवन केले जाते. ही प्रथा अनेक आदिवासींमध्ये दिसून येते. काही ठिकाणी रानभाज्यांच्या संदर्भात ही प्रथा पाहायला मिळते. म्हणजेच त्या ठिकाणी रानभाज्यांची पूजा करून मगच त्या रानभाज्यांचे सेवन केले जाते. उदा. सुभाष पावरा हे ‘पावरा समाज व संस्कृती’ या लेखातून म्हणतात, “पावरा समाजात निलपादेवीची पूजा केली जाते. निलपा म्हणजे पृथ्वीवरील हिरवेपणा यालाच निलपा देवी म्हणतात. निलपा देवीच्या पूजेनंतर सागाची पाने घरात वापरण्यास सुरुवात होते. व पावसाळ्यात नवीन पालेभाजी खाण्यास सुरुवात होते. त्या आधी शेतातील किंवा जंगलातील पालेभाजी खात नाहीत. नवीन शेण सारविण्यास वापरत नाहीत. प्रत्येक कुटुंबात कठीण व्रत पाळावे लागते. जर काही चुका झाल्या तर वाघ विविध मार्गाने त्रास देत असतो, असा समज आहे.”[६] यालाच वाघदेव पूजन असेही म्हटले जाते. मात्र डांगमधील वाघदेव पूजनाची प्रथा वेगळी आहे हे लक्षात घेतले पाहिजे. डांगमध्ये वाघदेव पूजनाच्या वेळी कोणत्याही पालेभाज्यांची पूजा केली जात नाही. पावरा समाजात आणखी एक सण साजरा केला जातो. हा सण म्हणजेच काकडी नवायचा सण. “काकडी नवाय शेतीच्या हंगामाशी असतो. पावसाळ्यात काकडी आणि भाजीपाला पेरलेला असतो. निलपा देवीच्या पूजेनंतर हा सण साजरा केला जातो. काकडी नवाई पूजेआधी शेतातील भाजीपाला खात नाहीत”[७] असे म्हटले आहे. काही आदिवासी तर आंब्याच्या फळाचेही पूजन केल्याशिवाय सेवन करत नाहीत. घरासमोर आंब्यांच्या फळांचा कितीही खच पडला तरी पूजन महत्त्वाचे असते. मात्र अशावेळी लहान मुलांना थोडीशी मोकळीक दिली जाते. घरातील कर्ते धर्ते पुरुष आणि स्त्रिया पूजन केल्याशिवाय आंबे खात नाहीत मात्र लहान मुलांना तसे बंधन नसते. ते केव्हाही आंबे खाऊ शकतात. शेतातील नवीन धान्यही पूजाविधी केल्याशिवाय ग्रहण केले जात नाही. ही प्रथा डांगच्या बहुतेक भागात पाळली जाते असे दिसून आले आहे.

**६. ६. २. गोंदण्याविषयी लोकप्रथा:**

शरीरावर गोंदूण घेणे ही आता एक फॅशन झाली आहे असे म्हणता येते. त्यातच सध्या बाजारात सहज, लवकर आणि आकर्षक पद्धतीने टॅटूज् काढून मिळतात. हे टॅटूज् तात्पुरते टिकत असले तरी ते आकर्षक असल्याने तरुणांची ओढ त्याकडे जास्त आहे. पूर्वी “आदिवासी स्त्रियांना इतर दुसऱ्या बलाढ्य टोळ्यांनी पळवून नेऊ नये म्हणून त्यांच्या कपाळावर, हातांवर गोंदूण घेतले जात असे. ते काही अंधश्रद्धेपोटी नव्हे, तर मुळात त्याचे कारणच असे होते की, आदिवासी स्त्रियांना पळवून नेलेच तर त्या स्त्रिया पुन्हा शोधायला सोप्या जाव्यात म्हणून, हा उदात्त हेतू त्याच्या मागे असायचा.”[८] असे ‘आदिवासी आयकॉन्स’ या पुस्तकात डॉ. तुकाराम रोंगटे म्हणतात. तर डॉ. प्रभाकर मांडे यांच्या

अभ्यासातून "मुलींना गोंदणे याचे कारण त्यांना दृष्टिबाधा होऊ नये हेच आहे."[९]ऐतिहासिक कारण काहीही असले तरी बहुतेक आदिवासी समाजात शरीरावर गोंदूण घेण्याची प्रथा दिसून येते. तसेच डांगमध्येही पूर्वीपासून आयाबायांच्या आणि पुरुषांच्या शरीरावर गोंदणे सापडतात. या गोंदण्यात प्रामुख्याने स्वतःचे नाव, पती किंवा पत्नीचे नाव, प्रेयसी किंवा प्रियकराचे नाव, आवडत्या देवी देवतेचे नाव, फुल, स्वस्तिक, ओम, कळस, नाग, देवतांच्या आकृती त्यातच मुख्यत्वे हनुमान, राम आणि लक्ष्मण यांच्या प्रतिमा असतात. शरीरावर काहीही गोंदले तरी चालते परंतु मृत्युपूर्वी माणसाने एकदातरी गोंदूण घ्यावे अशी यांची धारणा आहे. त्यामुळे गोंदूण घेण्याची प्रथा ते कसोशीने पाळतात.

**६. ६. ३. होळीविषयी लोकप्रथा:**

हिंदू धर्मात होळीचा सण अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामागे असलेल्या अनेक दंतकथाही खेड्यापाड्यातून विखुरलेल्या दिसतात. येथील डांगी आदिवासींसाठीही होळीचा सण अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. होळीसाठी लागणारा लाकूड येथे भरपूर असल्याने सणाला अजूनच रंगत येते. या सणाच्या वेळी सणासंबंधी असलेल्या अनेक लोकप्रथा पाहायला मिळतात. जसे की, होळीच्या तीन दिवस आधीपासून लहान होळी पेटविली जाते. त्यामुळे गावातील अनेकांना पुढे होळी येत असल्याची सूचना मिळते. ही तीन होळींची प्रथा अनेक गावांत पाहायला मिळते. होळीच्या सणाच्या दिवशी होळीला जेवण-पाणी देण्याची प्रथाही प्रत्येक गावात पाहायला मिळते. काही ठिकाणी पुरण पोळीचे जेवण असते तर काही ठिकाणी साध्या पोळी-भाताचे जेवण असते. परंतु जेवण असणे गरजेचे असते. हे जेवण देतांना ते परंपरेने डावीकडून उजवीकडे फिरतात. म्हणजेच घड्याळातील काट्यांच्या विरुद्ध दिशेला फिरतात. त्यांच्या कोणत्याही कार्यात डावीकडून उजवीकडेच फिरले जाते. मग ते जातं का असेना. होळीच्या सणाच्या दिवशी अजून एक प्रथा पाळली जाते ती म्हणजे बोंब ठोकणे. या बोंबमध्ये अनेक अश्लील शब्दांचा भरणा असतो. जे अश्लील शब्द सामान्यवेळी आपण उच्चारू शकत नाही. ते शब्द त्यावेळी बिनधास्तपणे उच्चारले जातात. इतकेच नाही तर ओरडून ओरडून आख्या गावाला ऐकवले जातात. मात्र ही प्रथा पूर्वीपासून गावात चालत आली असल्याने त्यावर कोणी आक्षेप घेत नाही. ही प्रथा आज काही ठिकाणाहून हद्दपार झाली आहे असे म्हणता येत असले तरी तिचे अंश काही ठिकाणी दिसून येतेच.

एरव्ही आठवडे बाजारात जो सामान्यपणा दिसतो तो होळीच्या आधी आठ दहा दिवस जे आठवडे बाजार असतात त्यात दिसत नाही. या बाजारांना एक खास रंगत आलेली असते. ती रंगत म्हणजे या बाजारात मिरवल्या जाणाऱ्या देवी देवतांच्या मुखवट्यांमुळे. त्यातही सप्तशृंगी देवीच्या मुखवट्यांचा भरणा अधिक असतो. या देवीची प्रतिमा एक मुखी असून अठरा भुजांची आहे. त्यामुळे अठरा भुजांची देवी साज शृंगार केल्यास अधिक आकर्षक दिसते. शिवाय सप्तशृंगी देवीचा गड महाराष्ट्राच्या नाशिक जिल्ह्यात असला तरी डांग जिल्ह्याला जवळ आहे. ते येथील आदिवासींचे आराध्यदैवत आहे. त्यामुळे या देवीचा प्रभाव त्यांच्यावर दिसून येतो. डांग प्रदेशात देवीच्या मुखवट्याची मिरवणूक काढून नाचण्याची प्रथा आहे. अशा अनेक सणांच्या, अनेक प्रथा सांगता येतील. प्रत्येक सण कोणत्या ना कोणत्या प्रथेवर, श्रद्धेवर आधारलेले असते असे दिसून येते.

### ६. ६. ४. शेतीविषयी लोकप्रथा:

भारत हा शेतीप्रधान, कृषिप्रधान देश आहे असे सगळ्यांना माहीत आहे असे आपण आजतरी गृहीत धरू शकतो. प्रसारमाध्यमांचा झालेला विकास आणि शिक्षणाचा झालेला प्रसार हे त्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. शेतकरीही जागा झाला असून तो त्याच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरतो आहे. नांगराने, वखराने होणारी शेती आता ट्रॅक्टरने होऊ लागली आहे. एकूणच काय तर शेतीचा आज अनेकांगाने विकास होत आहे. असे असले तरी शेतकऱ्यांचा एक भाग असाही आहे की जो मागासलेला आहे, शेतीत आजही पारंपारिक पद्धतीने कष्ट करत आहे, पारंपारिक बी बियाणांचा वापर करत आहे आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे तो आजही शेतीला देवत्वाचे रूप देत आहे. शेतीला देवत्वाचे रूप देण्याची प्रथा फार जुनी आहे. परंतु ही प्रथा आज अनेक शेतकऱ्यांनी मागे टाकली असून अनेक शेतकरी नवनवीन अवजारांचा वापर करत आहेत. मात्र डांग जिल्ह्यातील शेतकरी अजूनही पारंपारिक पद्धतीनेच शेती करतांना दिसतात. ते आपल्या शेतीला देवत्वाचे रूप देतात.

राब (डांगी बोलीत आदोर) करण्याची परंपरा डांगमध्ये दिसून येते. त्यासाठी लागणारा पालापाचोळा, झाडाच्या लहान मोठ्ठ्या फांद्या, शेणाच्या गौऱ्या आणि गवत यांचे मुबलक प्रमाण असल्याने ही प्रथा आजही टिकून आहे. पुढेही राहणार आहे.

तेरा हा सण येथील आदिवासींसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. तेरा मुळात एका रानभाजीचे नाव आहे. अळूसारखीच दिसायला असणारी ही भाजी पावसाळ्याच्या सुरुवातीला जंगलात उगवते. या सणामागील प्रथा अशी की, कोणताही शेतकरी आपल्या पावसाळी शेतीची म्हणजेच खरीप शेतीची लावणी तोपर्यंत करत नाही जोपर्यंत तेरा हा सण पाळला जात नाही. हा सण पाळण्याची निश्चित अशी तारीख नसते. मात्र मंगळवार किंवा रविवार हा दिवस निश्चित करून हा सण पाळला जातो. तेरा ही भाजी जंगलात उगवली की पावसाला चांगली सुरुवात झाली असे समजून लावणीला सुरुवात केली जाते.

नाचणीचे पिक कापणीला येते त्यावेळी प्रत्यक्ष कापणी करण्याआधी एक कोंबडा विधीपुर्वक कापला जातो. त्याला गाहा घेणे असे म्हणतात. काही ठिकाणी फक्त नाचणीच्या पिकाच्या वेळी कोंबडा कापला जातो. तर काही ठिकाणी सुरुवातीचे कोणतेही पिक कापण्याआधी कोंबडा कापला जातो. ही प्रथाही बहुतेक शेतकरी पाळतात. हे पिक खळयात आणल्यानंतर, मळणी केल्यानंतर त्याची पूजाविधी करूनच ते घरात घेतले जाते. शिवाय ते ग्रहण करण्याआधीही एखादा पूजाविधी पार पाडला जातो. उदा. पावरा समाजात “भात नवाय हा सण शेतातून नवीन आलेला भाताचा खाण्यापिण्याचा असतो.”[१०] अशा शेतीविषयक अनेक लोकप्रथा डांगमध्ये दिसून येतात.

### ६. ६. ५. देवतांविषयी लोकप्रथा:

येथील आदिवासींच्या अनेक देवता आहेत. त्यांच्या देव्हाऱ्याचा जरी विचार केला तरी कितीतरी देवतांचा परिचय होईल. त्यात प्रामुख्याने महादेव, खंडोबा, मरीआई, भवानी, म्हसोबा, बहिरोबा, हिरोबा अशा अनेक देवतांचा उल्लेख करता येईल. त्या त्या देवतेचे स्थान त्यांच्या त्यांच्या ठिकाणी महत्त्वाचे असून प्रत्येकाची कोणत्या ना कोणत्या स्वरुपात पूजाविधी केली जाते. ही प्रथा जवळपास प्रत्येक कुटुंबातून दिसून येते. झाडाझुडपांना, पशु-पक्ष्यांना, नदी-नाल्याला, डोंगर-

टेकड्यांना, दगडांना, येथील आदिवासी देवत्व देतात. वड, पिंपळ, उंबर, आपटा (शिद), पळसासारखी अनेक झाडे पवित्र मानतात. म्हणून त्यांचा कधी सरपण म्हणून वापर करत नाहीत. गाय, बैल, कुत्रा यांनाही ते देवत्व देतात. एखाद्या नदी किंवा नाल्याविषयी एखादी धार्मिक कथा सांगितली जाते. त्यावेळी त्या नदी किंवा नाल्यालाही आपोआपच देवत्व प्राप्त होते. हीच गोष्ट डोंगर किंवा टेकडीची सांगता येईल. शिवाय त्यांच्यात डोंगऱ्यादेवाचा उत्सवही महत्त्वाचा मानला जातो. एखाद्या साध्या दगडाला शेंदूर लावून हळद कुंकू वाहिले की तेथेही त्या दगडाला देवत्व प्राप्त होते. असे अनेक देव जळी-स्थळी निर्माण झालेले दिसतात. त्यांची पूजा ही परंपरेने पार पाडली जाते. उदाहरण म्हणून वाघदेवाचे घेता येईल. वसुबारसेला वाघदेवाची मनोभावे पूजा केली जाते. त्या दिवशी वाघदेवाला एक कोंबडा अर्पण केला जातो. पूर्वी बोकड अर्पण केला जात असे परंतु सध्या बोकडाची प्रथा बंद झाली आहे. जंगलातील वाघाचा गुराख्यांच्या गुरांना कुठल्याही प्रकारची इजा होऊ नये हा त्यामागील उदात्त हेतू असल्याचे अनेक अभ्यासक सांगतात. मात्र ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीचे मत काहीसे वेगळे आहे. त्यांच्या मते त्यांच्याकडून "वाघ ह्या प्राण्याची पूजा केली जात नाही. तर वाघदेवाची पूजा केली जाते. आपल्या गुरांचे वाघापासून संरक्षण व्हावे ह्यासाठी वाघांच्या राजाची आळवणी करणे, हाच त्यावर प्रभावी मार्ग आहे, असे मानतात. वाघाला ते वाघ ह्या नावाने हाक मारत नाहीत, तर खड्या किंवा चोबडा (रेडा) ह्या नावाने संबोधतात."[११] म्हणजेच वाघ आणि वाघदेव यांच्यात ते स्पष्टपणे फरक करतात. वाघदेव हा वाघांचा राजा असतो असे ते मानतात. आणि म्हणून ते वाघाला वाघ न म्हणता खड्या म्हणतात. डांगी बोलीतही वाघाला वाघ असे संबोधत नाहीत. तर खड्या असेच संबोधतात. परंतु ते वाघदेव म्हणजेच वाघ असे मानतात. वाघ या प्राण्याचीच प्रतीकात्मक रूपाने पूजा करतात. पूजेच्या वेळी हळद कुंकू वाहून नारळ फोडला जातो. दारू पिल्ली जाते. जेवण केले जाते. हा लोकप्रथेचाच भाग समजला जातो. त्याच दिवशी संध्याकाळी गावातील मखरावर किंवा गावात येणाऱ्या एखाद्या वाटेवर गवत पेटवून अग्नीज्वाला निर्माण केली जाते. त्यावरून गावातील तरुण पुरुष उड्या मारतात. अशा अनेक देवतांविषयीच्या लोकप्रथा डांगमध्ये पाहायला मिळतात.

**६. ६. ६. यात्रा-उत्सवांविषयी लोकप्रथा:**

डांगमध्ये प्रामुख्याने महाशिवरात्रीला यात्रांना उधान आलेले असते. त्यावेळी एखाद्या डोंगरावर एखादे जुने मंदिर असेल तेथे तेथे अशा यात्रा भरतात. एखाद्या गावात नावाजलेले किंवा जागृत देवस्थान असेल अशा ठिकाणीही अशा यात्रा आयोजित केल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने भेंसकात्री, बरमेवड, साल्हेर-मुल्हेर (महाराष्ट्र), केम (महाराष्ट्र) आणि डांग दरबार या ठिकाणांचा उल्लेख करता येईल. लोकांनाही तेथे परंपरेनेच जाण्याची सवय असल्याने तेही न चुकता देव दर्शनासाठी म्हणून जातात.

डांग जिल्ह्यातील एक सर्वांना आकर्षित करणारा उत्सव म्हणजे येथील 'डांग दरबार' होय. डांग दरबार खरे तर सांस्कृतिक उत्सव नाही. तो खऱ्या अर्थाने राजकीय उत्सव आहे असे आपण म्हणू शकतो. कारण या उत्सवामध्ये डांगमधील जंगलाचे रक्षण करणाऱ्या डांगच्या आदिवासी भिल्ल राजांना सन्मानपत्र व काही रक्कम दिली जाते. ही रक्कम गुजरातच्या राज्यपालांमार्फत दिली जाते. त्यामुळे त्याला राजकीय अधिष्ठान आहे. परंतु मागील काही वर्षांचा विचार केला तर त्याला सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभतांना दिसत आहे. डांग दरबारमध्ये अनेक पारंपरिक सांस्कृतिक खेळ, नृत्य,

गीते, नाटक, कला यांचे सादरीकरण केले जाते. हे सादरीकरण बघण्यासाठी परिसरातील तसेच इतर राज्यातील माणसे उपस्थित असतात. यावेळी येथे यात्रेचे स्वरूप आलेले असते. हा उत्सव दरवर्षी होळीच्या आधी आठ-दहा दिवसापासून होळीपर्यंत सुरू असतो. डांग दरबाराला राजकीय आणि सांस्कृतिक अशा दोन बाजू लाभलेल्या असून ही प्रथा मागील सत्तर ते ऐंशी वर्षापासून सतत चालू आहे.

**६. ६. ७. विवाहाविषयी लोकप्रथा:**

विवाहासंबंधी लोकगीतांचा आपण प्रस्तुत प्रबंधाच्या चौथ्या प्रकरणात सविस्तर विचार केला आहे. त्यानिमित्ताने विवाहाविषयी बरीच माहिती पुरविली गेली आहे. तरीही विवाहगीते म्हणजे संपूर्ण विवाह असा अर्थ होत नाही. विवाहात गीतांव्यतिरिक्त अनेक बाबी असतात. त्यापैकी काही बाबी लोकप्रथेच्या रूपाने येथे नमूद करण्याचा प्रयत्न केला आहे.

विवाह करण्यासंबंधी काही नीतीनियम ठरलेले असतात. हे नीतीनियम म्हणजेच प्रथा, परंपरा. ह्या प्रथा कशा असतात तर, कोणतेही लग्न ठरले की मांडवापासून त्याची सुरुवात होते. मुलाचे लग्न असेल तर लग्नाच्या तीन किंवा चार दिवस आधी विधीपूर्वक मांडव घातला जातो. आणि मुलीचे लग्न असेल तर लग्नाच्या एक दिवस आधी मांडव घातला जातो. ही मांडव घालण्याची परंपरा प्रत्येक लग्नामध्ये दिसून येते. त्यानंतर तो मांडव परंपरेने आणि विधीपूर्वक सुतला जातो. पाच किंवा सात धान्य टाकून दोन माठांची स्थापना केली जाते. वधूवरांना हळद लावली जाते. मुलाच्या लग्नात ढाका वाजवल्या जातात. आणि शेवटी लग्न लावले जाते. ह्या लग्नाच्या वेळी अनेक प्रथांचे पालन केले जाते.

**६. ६. ८. जन्म-मृत्यूविषयी लोकप्रथा:**

जन्म आणि मृत्यू ह्या मुळातच गूढ कल्पना आहेत. प्रत्येक समाजात जन्म आणि मृत्यूविषयी अनेक लोकप्रथा पाळल्या जातात. डांग प्रदेशही याला अपवाद आहे असे म्हणता येणार नाही. डांगमध्ये मुल जन्माला आले की पाचव्या दिवशी त्या मुलाची पाचवी केली जाते. ही पाचवी सुईनच्या हातून करण्याची प्रथा आहे. या दिवशी दारू पिण्याची प्रथा आहे. कास्याचे ताट वाजवण्याची प्रथा आहे. पाचवीच्या आदल्या रात्री थाळीकथा लावण्याची प्रथा आहे.

मृत्यूविषयी निरीक्षण केले असता, मृत्यू झाल्यानंतर त्याला कोमट पाण्याची अंघोळ घालण्याची प्रथा या प्रदेशात दिसून येते. पावरा समाजातही ‟मृताचे दंतन करून अंघोळ घालतात.”[१२] ‟भिल्ल समाजात मृत व्यक्तीच्या प्रेताचे दंतन (दात घासणे) केले जाते.”[१३] वऱ्हाडातील खेड्यापाड्यांतून ‟स्मशानात नेण्यापूर्वी प्रेताला हंडाभर पाणी गरम करून, चांगले साबण लावून पाच सुवासिनी अंघोळ घालतात.”[१४] थोडक्यात ही प्रथा बहुतेक आदिवासींमध्ये दिसून येते. तसेच नवीन कपडे घालण्याचीही प्रथा येथे दिसते. तिरडी बांबूपासून तयार केली जाते. ह्या तिरडीचे उभे आडवे बांबू अंबाडीच्या वाळलेल्या सालीपासून बांधले जातात. इतर धाग्याने किंवा दोरीने बांबू बांधले जात नाहीत, ही प्रथा विशेष लक्षात घेण्यासारखी आहे. स्त्रिया स्मशानात येत नाहीत मात्र अर्ध्यापर्यंत येतात. अर्ध्यापर्यंत आले की, तिरडी खाली उतरवतात. तेथे खांदे देणारे मागचे पुढे होतात आणि पुढचे मागे येतात. येथूनच स्त्रिया माघारी येतात. स्मशानात गेल्यानंतर मृत व्यक्तीचे डोके दक्षिणेला करून सरणावर

ठेवतात. अग्नी देण्याआधी मृत व्यक्तीच्या तोंडात कोरडे भात आणि पाणी घालतात. हे काम अनेक आप्तेष्ट, मित्र वगैरे करतात. शेवटी एखादा पैसा आणि ऐपतीप्रमाणे सोन्याचांदीचा एखादा तुकडा तोंडात घातला जातो. दारुडी व्यक्ती असेल तर थोडी दारूही अर्पण केली जाते. दहाव्या दिवशी दशक्रियाविधी पार पाडला जातो. त्या आधीच्या रात्री थाळीकथा लावली जाते. यावेळी मुंडण करण्याची प्रथा आहे. पिंडदान करण्याचीही प्रथा आहे.

### ६. ७. डांग जिल्ह्यातील लोकभ्रम:

लोकभ्रम सृष्टीवर सर्वत्रच पसरलेले दिसतात. अगदी एखाद्या अमेरिकेसारख्या प्रगत देशाचा जरी विचार केला तरी तेथेही अनेक लोकभ्रम अस्तित्वात आहेत. त्यामानाने भारतासारख्या देशात तर त्यांची संख्या अधिक असणे स्वाभाविक आहे. त्यातही डांगसारख्या मागासलेल्या भागात त्यांचा भरणा अधिकच आहे. मी डांगमध्ये अभ्यासाच्या निमित्ताने प्रत्यक्ष फिरत असतांना, माहिती संकलन करत असतांना, लोकांना भेटी देत असतांना एका माणसाने एक मजेशीर गोष्ट मला सांगितली. मी चार पाच जनांना एकत्र घेऊन अनेक विषयांवर चर्चा करत होतो. भुताखेतांचा विषय निघताच एक जन म्हणाला, "डांगमा भूता रहता हा, घाटला माणसा रहता हा अन् आहा त गुजरातमा देवा रहता हा." म्हणजेच, 'डांगमध्ये भूतं राहतात, घाटावर (नाशिक जिल्ह्याचा उत्तर भाग) माणसं राहतात आणि गुजरातमध्ये देवं राहतात.' ही गोष्ट त्या माणसाने नुसती हसण्यावारी सांगितली नाही. त्यामागे त्याची प्रबळ निरीक्षण शक्ती होती, त्याला आलेला जिवंत अनुभव होता. पुढे त्याच माणसाने ही गोष्ट अधिक पटवून देण्यासाठी मला समोर बोट करत म्हटले, "या हेर घरा! यमाहून अर्दे घरासावर लाल-धवळा झेंडा दिसतील. महनाला दस हजार कमावजहन त पाच हजार येसालाज (भूत, भगत, चेटकिणीसारख्याला) जाता हा. दोन तीन हजार सावकारी दिजहन. एक दोन हजार पोसासा खर्स. महना पुरा हुय हुय ताव आमना हात रिता त्या रिताज." म्हणजेच, 'ही बघ घरं! यांच्यातून अर्ध्या घरांवर लाल-पांढरे ध्वज दिसतील. महिन्याला दहा हजार कमवितो तर त्याच्यातून पाच हजार यांनाच (भूत, भगत, चेटकिणीसारख्याला) जातात. दोन तीन हजार सावकारी दिली जाते. एक दोन हजार मुलांचा खर्च. महिना हो हो तोवर आमचे हात रिकामे ते रिकामेच.' ही खरी परिस्थिती त्याने माझ्यासमोर काही मोजक्याच शब्दात वर्णन केली. परंतु ह्या थोड्या शब्दातही खूप मोठा आशय दडलेला होता याची मला प्रकर्षाने जाणीव झाली. अशा अनेक समस्या लोकभ्रमातून निर्माण झाल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे जाणून घेता येतील.

#### ६. ७. १. भुताविषयी लोकभ्रम:

माणसाला लहानपणापासूनच शिकवले, समजावले जाते की, 'बाळा तेथे जाऊ नकोस, भूत असते.' मग माणूस तेव्हापासूनच घाबरायला लागते. भूत ही कोणी अक्राळविक्राळ शक्ती असते आणि त्यापासून आपल्या जीविताला धोका असतो. म्हणून आपण त्याला घाबरायला हवे असे आपले मन सांगते. भुताविषयीची भीती माणसाच्या मनामध्ये लहानपणापासूनच रुजविली जाते. तेव्हापासूनच माणसाच्या मनामध्ये 'भूत' ही कल्पना घर करून राहते. माणसाचे मन जितके घाबरट असेल तितके भुताविषयी लोकभ्रम जास्त असतात असे दिसते. मुळात भूत ही कल्पनाच माणसाच्या अंतर्मनातील भीतीतून निर्माण झाली आहे असे आपण म्हणू शकतो. कारण ज्या माणसाच्या ठायी

भीती नाही त्याला कधीही भूत दिसले नाही किंवा दिसणार नाही. मग भूत कोणाला दिसते? तर ज्याला भुताबद्दल मुळातच भीती वाटते, ज्याला 'भूत या जगात आहे' ही कल्पना पटवून दिलेली असते किंवा स्वतःला पटलेली असते अशांनाच भूत दिसते. मग या जगात खरोखर भूत आहे की नाही? तर याचे उत्तर असे देता येईल की, ज्याने मानले त्याच्या दृष्टीने भूत आहे आणि ज्याने नाही मानले त्याच्या दृष्टीने भूत नाही. कारण भूत न मानणाऱ्यांच्या संख्येपेक्षा मानणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. डांगच्या दृष्टीने तर भूत न मानणाऱ्या माणसांची संख्या बोटावर मोजण्याइतकीच आहे.

डांगच्या दृष्टीने सगळीच भूतं वाईट किंवा धोकादायक नसतात. काही भूतांना हवे असलेले प्राप्त करून दिले तर ते माणसाचे उद्धारकही होऊ शकतात. भुतांना प्रामुख्याने दारू, मांस, मटन, अंबल (मिस्त्री/तपकीर, तंबाखू, बिडी इत्यादी) आवडते. या पदार्थांची मागणी भुतांकडून केली जाते असे यांना वाटते. म्हणून अनेक विधी करून त्यांना हे पदार्थ अर्पण केले जातात. ते संतुष्ट झाल्यास त्यांची कृपा या माणसांना लाभते असे यांना वाटते. ही भुते प्रामुख्याने मोठ्या आणि जुनाट झाडांवर राहतात, पाण्याखाली राहतात, घनदाट जंगलात राहतात, एखाद्या उजाड माळावर राहतात. ही भुते शेतीचे किंवा घरादाराचे रक्षणही करतात. शेतीवर आलेल्या चोरांना हाकलून लावतात. शेतीच्या कामात काहीवेळा अदृश्यपणे मदतही करतात. यांना हटकून दिसणाऱ्या भुतांपैकी एक म्हणजे रानवा. एका आजीने मला सांगितले की, "मा दारू धगवी थवा. त तो (रानवा) रातने बारेक वागे यीन पी जा. मा कोडिक वखत तेला हेरण्याहाव. पण तो माला काही करं नी." म्हणजेच, 'मी दारू गाळून ठेवत होती. तर तो (रानवा) रात्री बारा एक वाजेला येऊन पिऊन जायचा. मी कितीतरी वेळा त्याला बघितलं आहे. पण तो मला काहीही करत नाही.' ह्या आणि अशा कितीतरी लोकभ्रमांवर त्यांचा विश्वास आहे. हा रानवा दिसायला गोरापान असतो, त्याचे सगळे कपडे पांढरेशुभ्र असतात, डोक्यावर पांढरी टोपी असते, हातात एक काठी असते. तो सुंदर, देखण्या स्त्रियांवर प्रेम करतो. त्यांच्याशी शरीरसंबंध ठेवतो. कधी कधी त्यापासून अपत्यप्राप्तीही होते. तो प्रेम करणाऱ्या स्त्रीला कामात मदत करतो. रात्रीच्या वेळी तो त्या स्त्रीला घरातून काढून घेतो. गायी गुरे रात्रीच्या वेळी चारायला नेतो. असे अनेक लोकभ्रम भूतांविषयी सांगितले जातात. याला पुष्टी मिळते ती ठाणे जिल्ह्यातील वारल्यांकडून. येथे रानव्याला बरंभा असे म्हटले जाते. "असे म्हणतात की ह्या शक्तीला (बरंभ्याला) तरुण व सुंदर स्त्रीचा सहवास आवडतो. जरी तो दिवसा दिसत नसला तरी ज्या स्त्रीवर तो प्रेम करतो ती जंगलात ज्यावेळी कामाला जाते त्यावेळी तो तिचा पाठलाग करतो. ज्यावेळी कुणीही पाहात नाही अशा रात्रीच्या वेळी तो तिच्याशी संबंध ठेवतो. तिचा पती जरी तिच्या शेजारी असला तरी त्यालाही तो दिसत नाही. आपल्याबरोबर कोणती तरी परकी शक्ती आहे असा त्या स्त्रीला फक्त भास होतो. जर त्या स्त्रीला त्याच्या संगतीत आनंद वाटला तर आपली गर्भधारणा होईपर्यंत ती त्याच्याशी संबंध ठेवते. कोड असलेले अपत्य हे बरंभापासून झाले आहे असे मानले जाते."[१५]कोड हा एक त्वचारोग असून कोड झालेली व्यक्ती पांढरी दिसते म्हणून ती व्यक्ती रानव्यापासून झाली आहे असा यामागचा भ्रम दिसतो.

### ६. ७. २. चेटकिणीविषयी लोकभ्रम:

चेटकिणीला डांगमध्ये 'भुताळी' असे म्हटले जाते. तर काही ठिकाणी 'डगरी' असेही म्हटले जाते. भुताळी स्त्री किंवा पुरुष असू शकतो. पुरुष असेल तर त्याला भुताळा असा पुलिंगी शब्द वापरला

जातो. भुताळीला आपली विद्या शिकून घेण्यासाठी एखादा गुरु करावा लागतो. ती विद्या पूर्ण शिकून झाल्यानंतर तिला घरातील कोणतीतरी रक्ताची व्यक्ती द्यावी लागते. उदा. भाऊ, बहिण, आई, वडील, पती, पत्नी, मुलं इत्यादी. अर्थात ही व्यक्ती कोंबड्या बकऱ्यासारखी बळी दिली जात नाही. ज्या व्यक्तीला दिले असेल त्या व्यक्तीला असाधारण रोग होऊन त्याचे काहीच दिवसात मरण होते. हा मृत्यू नैसर्गिकरीत्या झाल्यासारखे वाटते. ही व्यक्ती कळसावर दिली असे म्हटले जाते. मात्र काहीवेळा विद्या संपादन करूनही ठरलेली व्यक्ती दिली नाही, तर विद्या संपादन करणारी व्यक्ती वेडी होते असे म्हटले जाते. मुठ मारण्याचाही असाच एक प्रकार आहे. मुठ मारल्यानंतर धडधाकड माणूसही एका रात्रीत दगावण्याची भीती असते. मात्र येथील आदिवासी भगताकडे त्याचे उपाय असते. हा भगत त्या रोग्याची झाडणी करतो, मुठ उतारा करतो आणि रोग्याला बरा करतो. ही मुठ काही वेळा जनावरांवरही मारली जाते. त्यामुळे जनावरे दगावण्याची भीती येथील आदिवासींना असते.

चेटकिणीची विद्या ही प्रामुख्याने वाईट विद्या म्हणून प्रचलित आहे. तिला काळी विद्या किंवा अघोरी विद्या असेही म्हटले जाते. त्यामुळे चेटकिणीला सगळेच घाबरून असतात. कोणत्याही सण-समारंभात चेटकीण असलेल्या स्त्रीला मानाचे स्थान दिले जाते. अर्थात हे मानाचे स्थान भीतीपोटी दिले जाते. जेणेकरून त्या व्यक्तीला राग येऊ नये व आपल्यावर त्या व्यक्तीची वाईट दृष्टी पडू नये. उदा. गावातील प्रत्येक लग्नात अशा व्यक्तीला एखादी फडकी किंवा लुगडे दिले जाते. यावरून चेटकीण ठरविलेल्या व्यक्तीला किती घाबरतात हे लक्षात येते. प्रत्येक गावात अशा चेटकिणी सापडतात. एकही असे गाव सापडणार नाही की जेथे चेटकिणीविषयी काही सांगितले जात नाही. "भुताळी आपल्या बळीकडे आजारी माणूस, माशी, मांजर, किंवा कोंबडी ह्यांचे रूप धारण करून जाऊ शकते. तिला दूरचे अंतर कापण्यास जराही अवधी लागत नाही. तसेच ती जाताना कुणालाही दिसत नाही."[१६]असे अनेक लोकभ्रम चेटकिणीविषयी डांगमध्ये पसरलेले दिसतात.

### ६. ७. ३. पशु-पक्ष्यांविषयी लोकभ्रम:

ज्याप्रमाणे भूताविषयी, चेटकिणीविषयी समाजात लोकभ्रम पसरलेले आहेत, त्याचप्रमाणे काही पशु-पक्ष्यांविषयीही समाजात लोकभ्रम पसरलेले आहेत. कुत्रा हा सर्वांना परिचित असा प्राणी असून त्याचा संबंध दत्ताशी आणि खंडोबाशी जोडला जातो. त्यामुळे त्याला काहीप्रमाणात मानाचे स्थान मिळत असले तरी ग्रामीण भागात त्याला भुताळीचे वाहन म्हणून तुच्छतेने पाहिले जाते. रात्रीच्या वेळी भुताळी कुत्र्यावर बसून फिरते असा येथील लोकांचा भ्रम आहे. काहीवेळा भुताळी मांजरीचे रूप घेऊन फिरते असेही यांचे मत आहे. मात्र खरे मांजर आणि भुताळीचे रूप असलेले मांजर ओळखता येते. खऱ्या मांजरीला मिशा असतात तर खोट्या मांजरीला मिशा नसतात. भुताळीचे मांजरीत रुपांतर झाले तरी त्या मांजरीला मिशा नसतात याचे साधे कारण म्हणजे कोणत्याही स्त्रीला मिशा नसतात.

घुबड हा येथील आदिवासींना एक वेगळाच संदेश देऊन जातो. घुबड हा रात्रीच्यावेळी फिरणारा म्हणून तो निशाचर पक्षी आहे. त्याचे डोळे गोल, मोठे आणि समोर असतात. पक्षी दिसायला मोठा असून त्याचा आवाज वैशिष्ट्यपूर्ण असतो. "घुबड डोळे हलवू शकत नाही. म्हणून आजूबाजूला बघण्याकरिता त्याला डोके पूर्ण फिरवावे लागते. तो त्याची मान २७०° फिरवतो."[१७] असे अनोखे दिसणे हेच कदाचित येथील लोकांना भीतीदायक वाटत असावे. त्यामुळेच रात्रीच्यावेळी फिरणाऱ्या

घुबडाला भुताळीचे रूप समजण्यात येते. मांजरीप्रमाणेच भुताळी घुबडाचे रूप घेते असा समज आहे.सर्कांड्या नावाचा एक छोटा बिनविषारी साप जर मारला तर त्याचा शोध करत परत त्याच जातीचे सात साप येतात असा येथील लोकांचा समज आहे. त्यामुळे त्याला शक्यतो मारले जात नाही.

**६. ७. ४. देवतांविषयी लोकभ्रम:**

डांग जिल्ह्यातील प्रत्येक गावात मारुतीचे मंदिर पाहायला मिळते. कारण तो गावदेव म्हणून गावाचे रक्षण करणारा असतो. प्रत्येक सणाला त्याची पूजा केली जाते, त्याला नैवद्य चढवले जाते. गावातील प्रत्येक लग्नात त्याला मान दिला जातो. थोडक्यात गावातील कोणतेही कार्य शुभ होण्यासाठी त्याची करुणा भाकली जाते. हनुमानाच्या रामायण काळापासून अनेक लोककथा जनमानसात प्रचलित आहेत. तो रामाचा सच्चा भक्त होता, त्याने बालपणीच सूर्याला गिळले, शनीला त्याने आपल्या पायाखाली दाबले वगैरे अनेक वीरकथा त्याच्या प्रसिद्ध आहेत. परंतु तो एवढा वीर असूनही ग्रामीण भागातील चेटकिणीसारख्या काळी विद्या ग्रहण केलेल्यांना वश व्हावा. ज्याने प्रत्यक्ष सूर्य, शनीसारख्या देवांना सोडले नाही तो या चेटकिणींना कसा वश होतो हे कळत नाही. चेटकिणी कोणालाही पिडण्याआधी मारुतीला वश करतात, त्याला तंत्र मंत्राने बांधून टाकतात. जेणेकरून तो संबंधित व्यक्तीचे रक्षण करू शकणार नाही.

ग्रामीण भागात प्रत्येक कुटुंबाचा एखादा देव्हारा असतो. त्या देव्हाऱ्यात अनेक देवांचे टाक असतात. त्या देवतांची व्यवस्थित पूजा-अर्चा, दिवा-बत्ती केली नाही तर ते संबंधित कुटुंबाला कोपतात असा यांचा समज आहे. तसेच विटाळापासून दूर ठेवावे नाहीतर ते देव्हाऱ्यातून बाजूला निघून जातात असाही यांचा अनुभव आहे.

डांग आणि डांगच्या परिसरात गाव बांधणीचा प्रकार दरवर्षी केला जातो. ही गावबांधणी एखाद्या भगताकरवी साधारणतः पावसाळयाच्या सुरुवातीला केली जाते. जेणेकरून पावसाळयाच्या सुरुवातीला खराब पाण्यामुळे होणारे विविध रोग होऊ नयेत. थोडक्यात रोगांना गावाच्या वेशीबाहेरच ठेवण्याचा हा एक प्रयत्न असतो. आता गंमत अशी की, २०२०च्या मार्च एप्रिलमध्ये आलेली कोरोनाची भयंकर महामारी, या महामारीचा परिणाम या गाव बांधणीवरही झाला. जी गाव बांधणी जून महिन्यात होत होती ती कोरोनामुळे एप्रिल मे महिन्यामध्येच केलेली मी अनेक गावात पाहिली आहे. सांगण्याचा हेतू हा की, कोणतीही महामारी आली की हे लोक आपल्या पद्धतीने एखाद्या भगताकडून किंवा देवाला साकडं घालून त्याचे निवारण करण्याचा प्रयत्न करतात. कोरोनासारखी जगभर पसरलेली महामारी जर एखाद्या भगताकडून नष्ट करता आली असती तर एवढ्या लोकांचा बळी गेलाच नसता. म्हणजे भगताकडून किंवा एखाद्या देवाच्या कृपेने कोणतीही महामारी गावाच्या बाहेरच थोपवता येते हा यांचा भ्रम आहे.

**६. ७. ५. जीवात्म्यांविषयी लोकभ्रम:**

माणूस मेला तरी त्याचा आत्मा अमर आहे असे हिंदू धर्मातील अनेक धर्मग्रंथांतून सांगितले आहे. त्यामुळे प्रत्येकाचीच अशी धारणा आहे की, माणूस मेला तरी त्याचा आत्मा अमर आहे. माणूस जन्माला आल्यानंतर त्याच्या पाचव्याच दिवशी सटीकडून त्याचा मृत्यूही लिहिला जातो, हाही त्यातलाच एक समज आहे. माणूस जन्माला आला म्हणजे तो कधी ना कधी मरणार हे निश्चित. परंतु

काही व्यक्तींचा मृत्यू हा नैसर्गिकरीत्या होत नाही. म्हणजे ती व्यक्ती एखाद्या अपघातात मरते, आत्महत्या करते, कोणाकडून तरी मारली जाते, विषारी साप किंवा हिंस्र पशुकडून मारली जाते. म्हणजेच अनैसर्गिकरीत्या मारली जाते. अशा व्यक्तीच्या काही आशा आकांक्षा अपुऱ्या असतात. त्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी त्या व्यक्तीचा त्याच घरात पुनर्जन्म होतो किंवा त्या व्यक्तीचा आत्मा अधांतरीच भटकत असतो असा यांचा भ्रम आहे. हा आत्मा अधांतरीच भटकू नये म्हणून ते स्मशानभूमीत मृत शरीराला नेल्यानंतर अग्नी देण्याआधी त्या व्यक्तीच्या आवडीच्या सर्व वस्तू तेथे ठेवतात. परंतु तरीही काही आत्मे संतुष्ट न झाल्यास ते कोपतात. रात्री घरात येतात, माणसांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतात. किंवा विशिष्ट काळ संपेपर्यंत ते तसेच भटकत फिरतात.

**६. ७. ६. भगताविषयी लोकभ्रम:**

ग्रामीण भागात चेटकिणीप्रमाणे अद्भुत शक्ती धारण करणारी दुसरी व्यक्ती म्हणजे भगत. चेटकिणीला वश करण्याची शक्तीही या भगताकडे असते. चेटकिणी सामान्यजनांना कोपण्यासाठी असतात तर भगत हे सामान्यजनांना रक्षण देणारे असतात. तर काही भगत हे रक्षक आणि भक्षकही असतात. म्हणजेच ते चांगल्याबरोबर वाईटही करू शकतात. त्यामुळे कमी अधिक प्रमाणात लोकं भगतालाही घाबरून असतात. भगत विद्या ग्रहण करतांना घरी जात नाहीत, स्त्रीसंग करत नाहीत, विटाळापासून दूर राहतात, अनेक प्रकारचे अन्न वर्ज करतात, दुसऱ्याच्या हातचे काहीही खात पीत नाहीत, ग्रहणाच्या मध्यरात्री ते नग्नावस्थेत नदीपात्रात उभे राहतात असे सांगितले जाते. गावात त्यांना भीतीयुक्त मान असतो.

भगत ही संस्था प्रामुख्याने ग्रामीणांचे रोग निवारण्यासाठी जन्माला आलेली संस्था आहे. हे रोग माणसांना जडलेले असतील किंवा जनावरांना, शेतीला, घराला किंवा एखाद्या व्यवसायाला वगैरे जडलेले असू शकतात. या प्रत्येक रोगाचे समाधान भगताकडे असते. इतकेच नव्हे तर एखाद्या दाम्पत्याला मूल होत नसेल तर त्याचेही समाधान या भगतांकडे असते. त्यासाठी ते जंगली वनस्पतींचा व तंत्र-मंत्राचा वापर करतात. एखादा ताईत गळयात किंवा हाताच्या दंडाला बांधतात. एखाद्या काळया-पांढऱ्या कपड्यात एखादे औषध किंवा देवाच्या साक्षीने तांदळाचे दाणे गळयात बांधण्यासाठी देतात. याला ते 'वचन' असे म्हणतात. वचन म्हणजे देवाच्या साक्षीने केलेला संकल्प असे म्हणता येईल. हा संकल्प मनातील इच्छित हेतू पूर्ण होईपर्यंत पाळायचा असतो. त्यासाठी भगत दाम्पत्याला किंवा फक्त संबंधित महिलेला काही बंधने घालतात. ही बंधने खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. दुडीचे पाणी पिऊ नये. (दुडीचे पाणी म्हणजे एकावर एक हंडे ठेवून वाहून आणलेले पाणी)

२. गावाची शिव (सीमा) ओलांडू नये.

३. घरच्या सदस्यांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाच्या हातचे खाऊ पिऊ नये.

४. कोंबड्याचे किंवा बोकडाचे मांस खाऊ नये.

५. खोबऱ्याचे तेल केसांना लावू नये.

६. बाजारातील मसाला खाऊ नये. (कारण त्यात खोबरं असण्याची शक्यता असते.)

७. खोबरं खाऊ नये.

८. रवा खाऊ नये.

९. बाजारातील हरभऱ्याच्या डाळया खाऊ नये.

१०. मुरमुरे खाऊ नये.

११. विटाळाचे काहीही खाऊ नये.

थोडक्यात सांगायचे तर देवाला जे जे पदार्थ अर्पण केले जातात ते ते पदार्थ खाऊ नये. उदा. खोबरं, रवा, कोंबडा, बोकड इत्यादी. देवाला अर्पण होणारे जे जे पदार्थ असतील ते ते पदार्थ पूर्णपणे वर्ज्य केले जातात. त्यामागचा सरळ हेतू हा की, वचन घेतल्यापासून संबंधित देवाला ज्या ज्या पदार्थांचे प्रसाद दिले जाते ते ते पदार्थ देवाला प्रसाद म्हणून अर्पण केल्याशिवाय आपण स्वतः खाऊ नये.

आता दुडीचे पाणी काय किंवा नळाचे, विहिरीचे, नदीचे, बोअरवेलचे पाणी काय शास्त्रीयदृष्ट्या सारखेच. फक्त ते पिण्यायोग्य हवे. पाणी कुठलेही असले तरी चालेल फक्त ते दुडीचे पाणी नको हे काही ठीक नाही. किंवा खोबऱ्याचे तेल केसांना लावू नये हेही काही ठीक नाही. म्हणजे यांचा संबंध एखाद्या रोगाशी किंवा मूल न होण्याशी असेल असे वाटत नाही. याव्यतिरिक्त भगतागणिक अनेक बंधने घातली जातात. ह्या सर्व गोष्टी लोकभ्रमातून निर्माण झाल्या आहेत असे म्हणता येते.

**६. ७. ७. गरोदरपणातील लोकभ्रम:**

गरोदर स्त्री ही मुळातच एक उत्सुकतेचा विषय असते. गरोदर स्त्रीला नेहमीच घरातील जाणत्या स्त्रियांकडून 'हे कर, ते करू नकोस' अशी शिकवण दिली जात असते. ही शिकवण दिली जात असतांना त्याच्या मागील कारणे मात्र सांगितली जात नाहीत. ही कारणे जाणून न घेताच गरोदर स्त्रीकडूनही त्या त्या गोष्टींचे काटेकोरपणे पालन केले जात असते. त्यामुळे त्याच्यामागील कारणांचा लोप होतांना दिसतो. यामध्ये प्रामुख्याने खालील गोष्टी शिकवल्या जातात.

१. गरोदर स्त्रीने कोणत्याही देवाच्या मंदिरात जाऊ नये, देवाचे मुखमंडल पाहू नये.

२. गरोदर स्त्रीने व तिच्या पतीने नारळ फोडू नये.

३. गरोदर स्त्रीने व तिच्या पतीने होळीचे दर्शन घेऊ नये.

४. गरोदर स्त्रीने दही खाऊ नये.

५. गरोदर स्त्रीने कच्चे किंवा ताजे शेंगदाणे खाऊ नये.

६. गरोदर स्त्रीने सूर्यग्रहण अथवा चंद्रग्रहण पाहू नये.

७. गरोदर स्त्रीने ग्रहणाच्या दिवशी विळयाने कोणतीही वस्तू कापू नये.

८. गरोदर स्त्रीने आपली सावली सापावर पाडू नये.

९. गरोदर स्त्रीने काकडी कापू नये.

१०. गरोदर स्त्रीने पपई खाऊ नये.

११. गरोदर स्त्रीने तव्यावर शिजलेली भाजी खाऊ नये.

१२. गरोदर स्त्रीने मृत व्यक्ती पाहू नये. (स्वतःचे आई वडील मृत पावले असले तरी पाहू नये.)

१३. गरोदर स्त्रीने सुईने काहीही शिवू नये.

१४. गरोदर स्त्रीने मोठ्या, पसरट ताटात जेवण करू नये.

याप्रमाणे गरोदर स्त्रीला अनेक शिकवणी दिल्या जातात. अशा शिकवणी कमी अधिक प्रमाणात सर्वत्र पाहायला मिळतात. उदा. वऱ्हाडात “प्रेतयात्रेला सामोरे गेल्यास किंवा प्रेताच्या अंघोळीचे पाणी ओलांडल्यास बाधा होते, असाही समज असल्याने लेकुरवाळी व गरोदर स्त्री बहुतेक या गोष्टी टाळते.”[१८]असे डॉ. लता लांजेवार म्हणतात. या गोष्टी न करण्यामागची कारणे मात्र त्या स्त्रीला माहीत असतीलच असे नाही. प्रत्येक वेळी कारण न सांगितल्याने आणि तशी गरोदर स्त्रीलाही गरज वाटत नसल्याने ही कारणे लोप पावत आहेत. एखाद्या वेळी अचानक एखादी गोष्ट न करण्यामागचे कारण विचारले तर ते सांगता येत नाही किंवा आयत्यावेळी सुचलेले एखादे बरे वाईट कारण सांगितले जाते. परंतु प्रत्येक गोष्टीच्या मागे काही ना काही तरी कारण असतेच. त्याशिवाय त्या गोष्टी जनमानसात टिकून राहू शकत नाहीत.

**६. ७. ८. बाळाविषयी लोकभ्रम:**

बाळ जन्माला आल्यानंतर त्यावर अनेक संस्कार केले जातात. अगदी पाचव्याच दिवशी पाचवीचा संस्कार केला जातो. बाळ हे नाजूक असल्याने अनेकांकडून त्याची काळजी घेतली जाते. खासकरून त्याच्या आईकडून विशेष काळजी घेतली जाते. या काळजीतूनच अनेक लोकभ्रम निर्माण होतात. उदा.

१. रिकामा हिंदोळा (झोका) हिंदळू नये.

२. रात्रीच्या वेळी झोक्याची गोधडी सोडून ठेवून दोर वरती बांधून ठेवावे.

३. घरात कोणी नसतांना व बाळ झोक्यात झोपलेले असतांना झोक्याच्या खाली जमिनीवर विळा ठेवावा.

४. बाळाची अंघोळ केल्यानंतर त्याच्या कानात फुंकर मारावी.

५. बाळाच्या कानात रोज सकाळ संध्याकाळ कोमट तेल घालावे.

६. बाळाला साधारणतः दोन ते तीन महिन्यांपर्यंत घराबाहेरची हिरवळ दाखवू नये.

७. बाळाचे बाळोते (कपडे) धुतल्यानंतर पिळू नये.

अशा अनेक गोष्टी असतात ज्या बाळाच्या काळजीतून पुढे आलेल्या असतात. आता रिकाम्या झोक्याचा आणि बाळाचा तसा विशेष काही संबंध येत नाही. परंतु रिकामा झोका दिला तर बाळाच्या पोटात दुखते असा लोकभ्रम आहे. बाळाला बाहेरची हिरवळ दाखवली तर बाळाची संडास हिरवी होते असा एक लोकभ्रम आहे. आता बाहेरच्या हिरवळीचा आणि बाळाच्या संडासचा काही संबंध

येत असेल असे मला वाटत नाही. बाळ झोक्यात झोपलेले असतांना झोक्याच्या खाली विळा ठेवणे म्हणजे शहाणपण आहे असे नाही. उलट अनावधानाने त्या विळ्यावर पाय पडून एखाद्याचा पाय कापला जाण्याची शक्यता असते. तरीही विळ्याशी संबंधित एक प्रथा मराठवाड्यातही दिसून येते. ती अशी की, "कुऱ्हाड किंवा विळा तीन किंवा सात वेळा उतरून टाकतात."[१९] असे अनेक लोकभ्रम बाळाविषयी सांगता येतात.

### ६. ७. ९. दृष्ट काढण्याविषयी लोकभ्रम:

माणसाची दृष्ट माणसाला लागू शकते. माणसाची दृष्ट एखाद्या पाळीव प्राण्याला लागू शकते. माणसाची दृष्ट घराला, शेतीला, झाडाला, गाडीला, दुकानाला किंवा एखाद्या व्यवसायाला लागू शकते. ही दृष्ट वाईट माणसांचीच लागते असे नाही. बाहेरच्या माणसांची दृष्ट लागते असेही नाही. शत्रूची दृष्ट लागते असेही नाही. आईची दृष्ट तिच्याच बाळाला लागू शकते. आजीची दृष्ट नातवाला लागू शकते. थोडक्यात सांगायचे तर दृष्ट कोणाची कोणालाही लागू शकते. दृष्ट शत्रू किंवा मित्र यांची ओळख ठेवत नाही. म्हणून घरा घरात बाळाची रोज दृष्ट काढतांना आई किंवा आजी दिसते. शेताच्या मध्यभागी एखादा पुतळा उभा करून त्याला फाटके तुटके कपडे घातलेले दिसतात. एखाद्या झाडाला खूप फळे आली असतील तर त्याला एखादी कातडी चप्पल बांधलेली दिसते. दुकानाच्या दारासमोर किंवा गाडीच्या समोर लिंबू मिरची बांधलेली दिसते. याप्रमाणे आणखी काही दृष्ट काढण्याचे प्रकार सांगता येतात. त्यातही लहान बाळाला लवकर दृष्ट लागते असे म्हणतात. म्हणून लहान बाळाची दृष्ट काढण्याचे प्रकार पाहणे विशेष महत्त्वाचे ठरते.

१. बाळाला दृष्ट लागली असता मीठ (खारं मीठ) मिरची बाळावरून सात वेळा उतरून टाकणे.

२. बाळाला दृष्ट लागली असता शिळी भाकर आणि पाण्याने भरलेला तांब्या उतरून टाकणे.

३. बाळाला दृष्ट लागली असता मोहरी सात वेळा उतरून टाकणे.

४. बाळाच्या कपाळी व तळपायी तव्याची मस लावणे.

५. कचोरा (एक वनस्पती) पेटवून त्याच्या धुराच्या सहाय्याने दृष्ट काढणे.

६. बाळाच्या हातात काळ्या बांगड्या घालणे.

७. बाळाच्या पायात कातडी वादी बांधणे.

८. बाळाच्या गळ्यात काळ्या पिवळ्या मण्यांची बाळगाठी बांधणे.

९. बाळाच्या कमरेला आणि पायाला काळा दोरा बांधणे.

१०. बाळाच्या डोळ्यांमध्ये काजळी भरणे.

११. दुकान, गाडी, कार्यालय इत्यादी ठिकाणी लिंबू, मिरची आणि काळ्या कापडाची बाहुली उलटी टांगून ठेवणे.

१२. दुकान, गाडी, कार्यालय इत्यादी ठिकाणी लहान कातडी चप्पल टांगून ठेवणे.

१३. शेतात एखादा बाहुला उभा करणे.

१४. शेतात मेलेल्या जनावराची हाडे, कवटी किंवा शिंगे काठीच्या सहाय्याने उभी करून ठेवणे.

१५. शेतात मेलेल्या पक्ष्याला काठीच्या सहाय्याने टांगून ठेवणे.

असे अनेक प्रकार डांगमध्ये दृष्ट काढण्यासाठी केले जातात. यात प्रामुख्याने काळया रंगाचा समावेश असलेला दिसतो. उदा. काळा दोरा, काळे मणी, काळी बाहुली, काळी काजळी, तव्याची काळी मस, काळ्या बांगड्या इत्यादी. काळा रंग हा अशुभ मानला गेलेला असला तरी दृष्ट उतरविण्यासाठी तो शुभ मानला जातो असे म्हणावे लागते. मीठ मिरची वगैरे तीन, पाच किंवा सात वेळा उतरून पेटत्या चुलीत टाकली जाते किंवा पाण्यात टाकली जाते. तसेच धुराच्या सहाय्यानेही दृष्ट काढण्यात येते. यावरून अग्नी आणि पाणी यांना दृष्ट निवारक शक्तीच्या रुपात पाहिले जाते असे म्हणता येते. डांगमध्ये आजही कोणी व्यक्ती बाहेर गेली असेल तर ती परत आल्यानंतर लगेच बाळाजवळ जात नाही. बाहेरून आलेल्या व्यक्तीच्या मागे दुष्ट शक्ती येते अशी यांची समजूत आहे. त्यामुळे बाहेरून आलेली व्यक्ती अंघोळ किंवा हात पाय धुतल्यानंतरच बाळाजवळ जाते. असे केल्याने दुष्ट शक्ती धुतली जाते किंवा बाळापासून दूर राहते असा समज आहे. यातील काही उपाय हे दृष्ट लागल्यानंतर उपयोगात आणले जातात. तर काही उपाय हे दृष्ट लागू नये म्हणून उपयोगात आणले जातात.

**६. ७. १०. इतर लोकभ्रम:**

आदोर पेरल्यानंतर घर सारवू नये. कारण आदोर उगवत नाही असे म्हटले जाते. सविस्तर सांगायचे तर आदोर म्हणजे राब, शेतीसाठी जमीन भाजली जाते ती जागा. या जागेवर किंवा भाजलेल्या जमिनीवर पाऊस पडला की भाताचे, नाचणीचे (नागलीचे) किंवा वरईचे (वरीचे) बी पेरले जाते. आता हे बी पेरल्यानंतर घर शेणाने सारवू नये असा संकेत आहे. का? तर घर शेणाने सारवल्यानंतर जसे घरातील खाचखळगे बुजले जातात, चिरा-फटी बुजल्या जातात आणि लहान मोठे धुलीकण दाबले जाऊन घर गुळगुळीत होते, तसेच आदरातील खाचखळगे, चिरा-फटी बुजल्या जातात आणि बी दाबले जाऊन जागा गुळगुळीत होते. म्हणजेच बी दाबले गेल्याने ते जमिनीच्या वर येत नाही, उगवत नाही असा यांचा समज आहे. खरेतर अवेळी पाऊस, अतिपाऊस, निकृष्ट बी, जमिनीचा खालावलेला पोत, बुरशी, कीटकांचा प्रादुर्भाव अशी अनेक कारणे बी न उगवण्याची आहेत. तरीही विनाकारण शेतीचे नुकसान होऊ नये, या भीतीपोटी ते आजही बी पेरल्यानंतर शेणाने घर सारवत नाहीत.

दुसरा भ्रम असा की, बारुंडावर म्हणजेच उंबरठ्यावर बसू नये अन्यथा कर्ज होते. कर्जाची भीती येथील लोकांना इतकी असते की ते कोणाला दाराच्या बारुंडावरही बसू देत नाहीत. तसे पाहिले तर दाराचे बारुंड ही काही बसण्याची जागा नव्हे. बारुंडावर बसल्याने येणाऱ्या जाणाऱ्यांना अडचण होते. म्हणजेच बारुंडावर बसून येणाऱ्या जाणाऱ्याचा रस्ता अडवू नये हा संकेत त्यामागे असावा. परंतु त्यासाठी थेट कर्जाचा सहारा घेणे हे काही योग्य नाही. कसेही असले तरी आजही लोकं बारुंडावर कोणालाही बसू देत नाहीत.

तिसरा एक लोकभ्रम असा की, कोंबडीने उधळण घातल्यावर पाहुणे येतात. कोंबडीने उधळण घालणे म्हणजे कोंबडीने भुसभुशीत माती आपल्या पंखांच्या सहाय्याने वर उधळणे. कोंबडीची ही क्रिया नैसर्गिक आहे. तरीही असे दृश्य दिसताच लोक म्हणतात की, घरी आज कोणीतरी पाहुणे येणार आहेत. कोंबडीची ही भविष्यवाणी खरी ठरेलच असे नाही. परंतु एखाद्यावेळी कोणी घरी पाहुणे आलेच तर मात्र कोंबडीने आपल्याला दिलेला संकेत खरा ठरला असे मानतात. असे अनेक लोकभ्रम आपल्याला डांगच्या प्रदेशात फिरतांना दिसतात.

### ६. ८. डांग जिल्ह्यातील लोकश्रद्धा:

प्रत्येक व्यक्ती कमी अधिक प्रमाणात श्रद्धाशील असते हे नाकारता येत नाही. म्हणूनच अगदी पायाला साधी ठेच जरी लागली तरी 'अरे देवा, हे भगवान, ओ गॉड' असे उद्गार व्यक्तीच्या तोंडातून सहज निघतात. कारण त्या व्यक्तीची देवावर नितांत श्रद्धा असते. ही श्रद्धा नुसती देवावरच असते असे नाही तर ती एखाद्या जवळच्या व्यक्तीविषयीही असू शकते. उदा. ठेच लागताच, 'अगं आई, अगं बाई, अरे बापरे' असे उद्गार सहज कळत नकळत मुखातून निघतात. कारण त्या व्यक्तीची आपल्या आईवर किंवा बापावर नितांत श्रद्धा असते. अशा अनेक लोकश्रद्धा जनमानसात सर्वत्रच पसरलेल्या असतात.

### ६. ८. १. देवतांविषयी लोकश्रद्धा:

माणूस जेव्हा जेव्हा हतबल होतो तेव्हा तेव्हा देवाला शरण जातो. तेथे त्याला मानसिक आधार प्राप्त होतो. जगण्याची एक ताकद मिळते, उर्मी मिळते, भरोसा मिळतो. ह्या ताकदीला, ह्या भरोशालाच आपण त्या देवाविषयीची असलेली श्रद्धा असे म्हणू शकतो. एखाद्या दगडाला जरी शेंदूर, कुंकू, हळद वगैरे लावली तरी तेथे देवाची निर्मिती होते अशी येथील लोकांची श्रद्धा आहे. म्हणूनच डांगच्या कानाकोपऱ्यात दगड धोंड्याच्या रूपाने अनेक देव, देवी दिसून येतात. एखाद्या बारीवर वाघोबा, नागोबाची शिळा दिसेल तर एखाद्या पाणवठ्याच्या जाही पाणदेवाची स्थापना केलेली दिसेल. या सगळ्याच देवी देवतांविषयी येथील लोकांच्या मनात दृढ श्रद्धा आहे.

या श्रद्धेपोटीच ते देवी देवतांना अनेक प्रकारचे नवस करतात, साकडं घालतात. नवस पूर्ण झाल्यावर जेही कबूल केले असेल ते विधिवत अर्पण करतात. नवसाचे दोन प्रकार आपल्याला सांगता येतील. एक म्हणजे नवस पूर्तीसाठी बळी दिला जातो. तर दुसऱ्यामध्ये बळीचा वगैरे प्रकार नसतो. आदिवासींच्या काही देवता या मांसभक्षक असतात तर काही मांसभक्षक नसतात. ज्या मांसभक्षक असतात त्यांना मांस अर्पण केले जाते. म्हणजेच कोंबडा, बकरा वगैरेंचा बळी दिला जातो. तर काही मांसभक्षक नसतात, शाकाहारी असतात. अशा देवी देवतांना रव्याचा प्रसाद, नारळ वगैरे अर्पण केले जाते.

मांसाहारी देवतांना नवस केल्यानंतर संबंधित व्यक्तीने नवस पूर्ण होईपर्यंत मांस खाऊ नये असा यांचा नियम आहे. कारण मांस त्या देवाचा प्रसाद असतो. हा प्रसाद देवाला अर्पण केल्याशिवाय खाऊ नये. हा नियम शाकाहारी देवतांच्या संबंधितही असतो. थोडक्यात ज्या देवाला जो प्रसाद अर्पण करणार आहोत किंवा अर्पण केला जातो. तो पदार्थ नवस पूर्ण होईपर्यंत पूर्णपणे वर्ज केला जातो. यात प्रामुख्याने कोंबडा, बकरा, नारळ, रवा, मुरमुरे इत्यादी वस्तूंचा समावेश असतो. इतकेच नाही तर या दरम्यान खोबऱ्याचं तेलही केसांना लावायचं नाही.

नवस करण्याच्या पद्धतीही वेगवेगळ्या पाहायला मिळतात. यामध्ये एखादा अवयव किंवा आवडती वस्तू गहाण ठेवली जाते किंवा वर्ज केली जाते. उदा. चप्पल न घालणे, एखादा आवडता पदार्थ न खाणे, मौन व्रत असेल तर कोणाशीही न बोलणे, गावजेवण देण्याचे कबूल करणे, पाच किंवा सात नारळ अर्पण करण्याचे कबूल करणे, एखादा सोन्याचांदीचा दागिना अर्पण करण्याचे कबूल करणे, देवीचे मंदिर असेल तर साडी चोळी अर्पण करण्याचे (ओटी भरणे) कबूल करणे, अनवाणी यात्रेला येण्याचे कबूल करणे, पाच आरत्यांना हजर राहण्याचे कबूल करणे, कोंबडा-बकरा बळी देण्याचे कबूल करणे अशा अनेक पद्धती असतात. या विविध पद्धती अवलंबण्याचे कारण म्हणजे त्या त्या देवी देवतांवर असलेली त्यांची श्रद्धा होय.

### ६. ८. २. मृतात्म्यांविषयी लोकश्रद्धा:

"मृत व्यक्तीचा आत्मा दहाव्या दिवशी पिंडदानाच्या वेळी स्मशानात पिंडाच्या बाजूला येतो. कावळ्याला हा आत्मा दिसतो. एवढेच नव्हे, तर त्या आत्म्यामार्फत मृत व्यक्तीचा त्याला चेहरा दिसतो. त्यावरून आत्मा सुखी आहे का दुःखी आहे, हे कावळ्याला कळते. आत्मा सुखी असल्यास कावळा पटकन पिंडाला शिवतो. मात्र आत्मा दुःखी दिसल्यास कावळा पिंडाला स्पर्श करणे टाळतो. त्याद्वारे मृताच्या नातेवाईकांना असा संकेत प्राप्त होतो की, मृत व्यक्तीचा आत्मा काळजीत आहे, दुःखी आहे. नातेवाईक आपल्या समजुतीनुसार त्या दुःखाचे कारण शोधून काढतात. मग त्या कारणाचे निराकरण करणारे संकल्प उच्चारतात. उदाहरणार्थ, लग्नाला आलेल्या मुलीचे लग्न करून देऊ, बेकार मुलाला नोकरी लावून देऊ. ही मानवी भाषा आत्म्याला समजते. त्याचा चेहरा आनंदी होतो. तो आनंदी चेहरा कावळ्याला दिसतो. मग कावळा पिंडाला शिवतो. मगच स्मशानात आलेले मृताचे नातेवाईक समाधानाने परत फिरतात."[२०] अशी लोकांची श्रद्धा जवळपास सर्वत्रच असलेली दिसून येते. याला अपवाद डांगही नाही. डांग जिल्ह्यातही पिंडदान केले जाते. त्यामागेही हीच श्रद्धा आहे.

डांग जिल्ह्यात आणि परिसरात आखाती (अक्षयतृतीया) आणि पित्रा (सर्वपित्री अमावस्या) हे दोन सण पितृत्म्याविषयी महत्त्वाचे मानले जातात. या दोन्ही सणांना आगारी टाकली जाते. आगारी म्हणजे पितृदेवतांच्या नावाने खीर, वरण, भात, भाजी, मासे इत्यादी पदार्थ तयार करून ते पितृदेवतांच्या नावाने घरावर टाकले जातात. यावेळी 'काव... काव... ये, काव... काव... ये.' अशी बोंब ठोकून कावळ्यांना बोलावले जाते. यावेळी आपले पूर्वज कावळ्यांच्या रूपाने जेवायला येतात अशी यांची श्रद्धा आहे. त्याआधी घरातील चुलीत पूर्वजांची नावे घेऊन वरील पदार्थ आणि पाण्याचा घास भरवला जातो. नंतर पूर्वज दारू पिणारे असतील तर त्यांच्या नावाने दारूही सोडली जाते. त्यावेळी त्या चुलीत घातलेले सर्व पदार्थ पुर्वजांपर्यंत पोहोचतात अशीही यांची श्रद्धा आहे.

### ६. ८. ३. टाक आणि चिऱ्यांविषयी लोकश्रद्धा:

टाक हे ग्रामीण भागात प्रत्येकाच्या देव्हाऱ्यात दिसून येतात. टाक दोन प्रकारचे असतात. एक म्हणजे हे टाक देवी देवतांचे असतात. उदा. महादेव, खंडेराव, महाराणी, हिरोबा, बहिरोबा इत्यादी. दुसरे टाक हे घरातील पूर्वजांचे असतात. पूर्वजांचे टाक बनवून घेणे यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असते. ते त्यांना देवाच्या रुपात पाहतात. म्हणूनच ते टाकांना टाक असे न म्हणता 'देव' असेच म्हणतात. शिवाय ते महादेव, खंडेराव यांच्याच जोडीला ठेवतात. पूर्वजांच्या टाकांसाठी वेगळी जागा

नसते. पूर्वजांचे जसे टाक असतात तसेच चिरेही असतात. चिऱ्यांनाच मराठीमध्ये विरगळ असेही म्हटले जाते. काही पूर्वज देव्हाऱ्यात यायला पसंत करत नाहीत. म्हणून त्यांच्यासाठी स्वतंत्र चिरे घडवले जातात. ह्या चिऱ्यांची स्थापना आपापल्या शेतात किंवा घराच्या आसपास कुठेतरी केलेली असते. ह्या टाकांची अथवा चिऱ्यांची व्यवस्थित काळजी घेतली नाही, त्यांची वेळोवेळी पूजाविधी केली नाही तर ते घरातील माणसांना कोपतात अशी यांची श्रद्धा आहे. डांग जिल्ह्यात चिरापाडा नावाचे एक गाव आहे. या गावाचे नाव अर्थातच चिऱ्यांवरूनच पडले आहे. हे चिरे गावाच्या वरच्या बाजूला होते असे येथील लोकं सांगतात. परंतु कालांतराने ते अचानकपणे नाहीसे झाले. तर काहींच्या मते ते ज्याच्या त्याच्या कुळांनी तेथून वाहून नेले असावेत. परंतु आत्तापर्यंतच्या इतिहासात विरगळांना किंवा चिऱ्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेल्याच्या घटना घडल्याचे दिसत नाही. चिऱ्यांची स्थापना करण्यासाठी विशिष्ट विधी पार पाडावा लागतो. तसा विधी चिऱ्यांचे विसर्जन किंवा पुनर्स्थापना करण्यासंबंधी कुठेही लिखित अथवा मौखिकरित्या आढळत नाही. त्यावरूनही चिऱ्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेणे संभवत नाही. दुसरे असे की ते कुठे, कोणी आणि कसे नेले ते गावातील कोणाही व्यक्तीला सांगता येत नाही. तिसरे असे की ते लाकडी असल्याने, शिवाय मोकळया माळावर असल्याने त्यांची झीज होऊन नामशेष झाले असावेत. या सगळया घटनांचा विचार करता चिऱ्यांची परंपरा प्राचीन असून तो लोकांच्या श्रद्धेचा विषय बनला आहे. या टाकांमागे किंवा चिऱ्यांमागे असलेला उदात्त हेतू म्हणजे पूर्वजस्मरण असे लोकसंस्कृतीचे अभ्यासक डॉ. द. ता. भोसले म्हणतात. त्यांनी विरगळांच्या रूपाने "पूर्वजांचे स्मरण करण्याचा प्रकार गेल्या तीनशे-चारशे वर्षांपासून प्रचलित असलेला पहावयास मिळतो"[२१]असे म्हटले आहे. यावरूनही चिऱ्यांची परंपरा खूप जुनी आहे असे म्हणता येते.

### ६. ८. ४. पशु-पक्ष्यांविषयी लोकश्रद्धा:

गाय, बैल, नाग, वाघ यांना येथील आदिवासींमध्ये मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यांच्या लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे किंवा आहाणे यांच्यात या प्राण्यांचा मोठा भरणा असलेला पाहायला मिळतो. त्यांच्या नावांचा उल्लेख वारंवार येतो. लोकगीतांमध्ये वाघाला 'वागू' आणि नागाला 'नागू' असे म्हटलेले अनेक ठिकाण दिसते. गाय आणि बैल जसे हिंदू धर्मात पवित्र मानले जातात. त्याचप्रमाणे येथील आदिवासीही गाय आणि बैलाला पवित्र मानतात. त्यांची पोळा आणि दिवाळीला पूजा करतात. बैलाची पूजा अतिप्राचीन काळापासून केली जात असावी. कारण पाच हजार वर्षांपूर्वीच्या सिंधू संस्कृतीच्या उत्खननात सापडलेल्या "बैलाइतकी सजीव चित्रे, मूर्ती इतर कोणत्याही प्राण्याची सापडत नाहीत. त्यामुळे त्या काळी बैलांची पूजा करणारा पोळ्यासारखा एखादा सण साजरा केला जात असावा, असा संशोधकांचा तर्क आहे."[२२] बैल हा शेतीशी संबंधित असलेला एक महत्त्वाचा घटक आहे. बैलाशिवाय शेतीचे काम होऊ शकत नाही याची जाणीव येथील शेतकऱ्यांना आहे. नागाची नागपंचमीला पूजा करतात. वाघाची आणि नागाची वसुबारसेला पूजा करतात. यावरून या प्राण्यांविषयी येथील लोकांच्या मनामध्ये किती श्रद्धा आहे हे दिसून येते.

कावळा हा पक्षी काही प्रमाणात उपेक्षित असला तरी पिंडदानाच्या वेळी, अक्षयतृतीयेच्या दिवशी, सर्वपित्री अमावस्याच्या दिवशी त्याला विशेष महत्त्व प्राप्त होते. त्याला साक्षात पूर्वजांच्या

रुपात पाहिले जाते. म्हणजेच त्या त्या दिवशी कावळ्याच्या रुपात आपले पूर्वज आपल्याला भेटायला येतात अशी यांची श्रद्धा आहे.

### ६. ८. ५. शेतीविषयी लोकश्रद्धा:

बहुतेक आदिवासी हे शेतकरी असल्याने ते शेतीची मशागत करतांना, बी पेरतांना, कापणी करतांना, मळणी करतांना, खळ्यात रास करतांना अनेक विधी करत असतात. त्यांच्या शेतीतील महत्त्वाचे आणि पवित्र पिक म्हणजे नाचणीचे पिक. नाचणीला डांग आणि डांगच्या परिसरात नागली म्हणतात. लोककथांमध्ये अन्नदेवता म्हणून कणसरेचा वारंवार उल्लेख येतो. कणसरा नावाची स्वतंत्र लोककथाही सांगितली जाते. तिचे अनेक भाग असून ती एका बैठकीत न संपणारी दीर्घ कथा आहे. या लोककथेतून कणसराचे महत्त्व विषद केले आहे. थोडक्यात अनादी काळापासून येथील आदिवासींना शेतीविषयी आस्था आहे, प्रेम आहे, श्रद्धा आहे. ते देवाहूनही श्रेष्ठ दर्जा कणसराला म्हणजेच शेतीला देतात हे यावरून स्पष्ट करता येते.

ते शक्यतो नाचणीचे धान्य बाजारात विकत नाहीत. त्यातही जर कोणी पापड करण्यासाठी नाचणीचे धान्य मागत असेल तर ते मुळीच देणार नाहीत. त्यांच्या मते पापड करतांना नाचणीचा बराचसा भाग निकामी (पापड करण्यायोग्य नसलेला भाग) म्हणून फेकून दिला जातो. मुळात नाचणीची किंवा कोणत्याही धान्याची नासाडी करणे हे त्यांच्या तत्त्वात बसत नाही. त्यांच्या लोककथेतूनही हेच तत्त्वज्ञान सांगितलेले आहे.म्हणूनच डाह्याभाई वाढू त्यांच्या ‘कुंकणा भाषेतील काही मौखिक कथा-गीते’ या लेखात म्हणतात, “धान्याच्या प्रत्येक दाण्याला कुंकणा लोक ‘कन्सरी’चे रूप मानतात. धान्ये पिकून घरात येतात त्या वेळेस कन्सरीची कथा गाण्यात येते. सर्जन, प्रलय, पुनःसर्जन, मनुचे वंशज आणि वंशावळीतील विशिष्ट व्यक्तींची जीवनकथा अशा पुराणातील पाच विषयांच्या अनुषंगाने कथा चालते. कन्सरीची कथा ही कुंकणांचे पुराणच आहे.”[२३] कणसरेची जोपर्यंत कुणबी (शेतकरी) काळजी घेईल तोपर्यंतच ती त्याच्याजवळ टिकून राहील अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे. कणसरा ज्या दिवशी रागावून निघून जाईल त्या दिवशी कथेत वर्णन केल्याप्रमाणे या सृष्टीवर दुष्काळ पडेल. म्हणून ते पापडासाठी नाचणी कधीही देत नाहीत. नाचणीची भाकरी शिळी असेल तरी ते फेकत नाहीत. दोन दिवसाची भाकरी ते गरम करून खातात किंवा गाय, बैल, कुत्रा, मांजर अशा प्राण्यांना खायला घालतात. मात्र उकीरड्यावर फेकतांना ते कधीही दिसणार नाहीत.

नाचणीची शेती कापण्याआधी गाहा घेतला जातो. म्हणजेच एका कोंबड्याचा विधिवत बळी दिला जातो. नंतरच नाचणीचे उभे पिक कापले जाते. खळ्यातही नाचणीच्या धान्याची पूजा केली जाते. नैवद्य दाखवले जाते. कथा सांगितली जाते.

उडीद हेही त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे पिक आहे. उडदाच्या डाळीला किंवा बेसनाला ते कधीही तेलाची फोडणी देत नाहीत. उडदाची डाळ किंवा बेसन ते कधीही फेकून देत नाहीत. थोडक्यात कोणत्याही धान्याची नासाडी न करणे हे त्यांना परंपरेने मिळालेले ज्ञान अतिशय महत्त्वाचे असून त्यावर त्यांची श्रद्धा आहे.

### ६. ८. ६. पायाळू व्यक्तीविषयी लोकश्रद्धा:

ज्या व्यक्तीचे जन्माच्या वेळी आधी पाय नंतर डोके बाहेर येते त्या व्यक्तीला पायाळू व्यक्ती असे म्हणतात. सर्वसाधारणपणे जन्माच्या वेळी व्यक्तीचे आधी डोके नंतर पाय बाहेर येतात. ज्या व्यक्ती पायाळू असतात त्या विशेष महत्त्वाच्या असतात असे यांना वाटते. गावात एखादी तरी अशी पायाळू व्यक्ती जन्माला आलेली असते. गावात कोणाचीही उसण भरली, पाठीला कळा लागल्या, हातापायात कळा लागल्या की अशा व्यक्तीला शोधले जाते. ही व्यक्ती काही चमत्कार करते अशातला भाग नाही. ही व्यक्ती सर्वसामान्यांसारखीच साधी भोळी असते. परंतु त्या व्यक्तीच्या पायांमध्ये जन्मताच काही अद्भुत शक्ती असते असे त्यांना वाटते. ह्या व्यक्तीने उसण भरलेल्या व्यक्तीच्या पाठीवरून आपले पाय सात वेळा उतरले किंवा चोळून दिले तर उसण भरलेली व्यक्ती ठणठणीत बरी होते अशी यांची श्रद्धा आहे.

मात्र पायाळू व्यक्तीला कडाडणाऱ्या विजेपासून दूर ठेवले जाते. म्हणजेच घरामध्ये वगैरे सुरक्षित ठेवले जाते. त्यांच्या मते पायाळू व्यक्तीवर लवकर वीज पडते.

### ६. ८. ७. इतर लोकश्रद्धा:

डांगमधील लोक ज्येष्ठ महिन्याच्या सुरुवातीला किंवा पाऊस पडण्याआधी काही नैसर्गिक बदलांवरून पाऊस किती दिवसात पडणार आहे याचा अंदाज बांधतात. त्यामध्ये ढगांची वाहून जाण्याची दिशा, वाऱ्याची दिशा, हवेतील आर्द्रता यांच्या निरीक्षणातून पावसाचा नेमका अंदाज बांधता येतो. त्याशिवाय एरव्ही काळे, पांढरे दिसणारे सरडे कवटीला लाल दिसायला लागले की पाऊस निश्चितच पडेल अशी त्यांची श्रद्धा आहे. त्याशिवाय पावसाळयात कडाडणाऱ्या विजेचा सर्वांनाच धोका असतो. त्यातच ही वीज सोने, पायाळू व्यक्ती आणि सरड्यावर जास्त पडते अशी यांची धारणा आहे. त्यामुळे कडाडणाऱ्या विजेपासून सुरक्षित राहायचे असेल तर कोणत्याही झाडाखाली थांबू नये. कारण झाडावर सरडा असण्याची शक्यता असते.

विजेचा आणि सरड्याचा जसा संबंध जोडला जातो, तसाच ढगांचा आणि माणसाच्या दुखण्याचा संबंध जोडला जातो. गतायुष्यात एखादा मोठा अपघात झाला असेल आणि त्यात त्या व्यक्तीला गंभीर इजा झाली असेल परंतु पुढे ती व्यक्ती ठणठणीत बरी झाली असेल तरीही ढग निघाल्यानंतर ते जुने दुखणे परत उफाळून येते अशी यांची मान्यता आहे. म्हणजे आकाशात ढग निघाले की खाली जमिनीवर माणसांचे सांधे दुखायला सुरुवात होते.

जमिनीखालील पाण्याची पातळी शोधण्याचे काम डांगमधील काही व्यक्ती करतात. विहीर खोदण्याआधी किंवा बोअरवेल काढण्याआधी पाणी बघणाऱ्याला बोलावले जाते. जमिनीखालील पाणी बघणाऱ्या व्यक्ती त्यांच्या अनुभवानुसार व मंत्र-तंत्रानुसार जमिनीखालील अचूक पाण्याचा साठा शोधून देतात यावर त्यांचा विश्वास आहे.

### ६. ९. डांग जिल्ह्यातील लोकविद्या:

'लोकविद्या' हा शब्द व्याप्तीने खूप मोठा आहे. त्यामध्ये पूर्ण लोकसाहित्याचा समावेश होऊ शकतो हे आपण यापूर्वीच पाहिले आहे. याठिकाणी फक्त परंपरेने चालत आलेले वनौषधींचे ज्ञान

अभ्यासावयाचे आहे. ही परंपरा जोपासणारी अनेक माणसं या परिसरात आजही आहेत. त्यांच्याजवळ असलेली ही लोकविद्या अतिशय महत्त्वाची असून ती आज काळाच्या पडद्याआड गडप होतांना दिसते. ही वनौषधी खालीलप्रमाणे सांगता येते.

**१. जांभूळ:** जांभूळ ही सर्वांना परिचित अशी वनौषधी आहे. फक्त त्याचे गुण सर्वांनाच माहीत असतील की नाही यात थोडी शंका आहे. जांभळाच्या झाडाचे तसेच त्याला येणाऱ्या फळांचे आरोग्याच्या दृष्टीने अनेक गुण आहेत. जुलाब होत असल्यास जांभळाच्या फळाचा रस किंवा झाडाचा रस ताकाबरोबर घेतल्यास फायदा होता. कानात जंतू पडले असल्यास जांभळाचा रस किंवा कोवळया पानांचा रस कानात टाकल्यास फायदा होतो. पित्ताची उलटी होत असल्यास जांभळाची आणि आंब्याची कोवळी पाने उकळून घ्यावी, नंतर ते पाणी मधाबरोबर प्यावे फायदा होतो. कावीळ झाल्यास जांभळाचा रस काढून त्यात खारं मीठ घालून एखाद्या पात्रात भरून ठेवावे, त्यातील एक एक चमचा दिवसाआड वैद्याच्या सल्ल्याने घ्यावा. असे अनेक फायदे या जांभळाच्या झाडापासून होतात.

**२. बाभूळ:** हाड मोडल्यास ते लवकर सांधले जावे यास्तव बाभळीच्या बिया भाजून त्याचा बारीक चूर्ण करावा. नंतर ते चूर्ण मधाबरोबर सकाळ संध्याकाळ खायला द्यावे. स्त्रीला पगर लागल्यास किंवा कमरेचे दुखणे असल्यास बाभूळ उपयोगी पडते. डोळे आल्यास बाभळीच्या फुलाचा रस मेंढीच्या मूत्रात मिश्र करून डोळयात टाकावे. अशक्तपणा आल्यास ताकद येण्यासाठी बाभळीचा रस तुपात मिश्र करून त्याच प्रमाणात साखर घेऊन खावे. याप्रमाणे बाभळीचे गुण श्रेष्ठ मानले जातात.

**३. खैर:** शक्ती वाढविण्यासाठी खैराचा चिक किंवा डिंक तुपात तळून खावे. घाव भरण्यासाठी घावाच्या ठिकाणी खैर या झाडाची साल कुटून लावावी. तोंड आल्यास खैराची साल पाण्यात उकळून त्या पाण्याने गुरळण्या कराव्यात. खैराच्या पानांच्या रसात त्याच्या लाकडाची रक्षा (राख) मिश्र करून पिल्यास कावीळ रोग बरा होतो. खैराचं मूळ किंवा खोडाची साल रात्री पाण्यात टाकून ठेऊन सकाळी ते पाणी गाळून पिल्याने लघवीचा त्रास किंवा जळजळ कमी होते.

**४. वड:** वारंवार होणारं गर्भपात थांबविण्यासाठी वडाच्या पारंब्याचे चूर्ण करून दुधाबरोबर नियमित घेतल्यास गर्भ सुरक्षित राहतो. शुक्राणूंची निष्क्रियता दूर करण्यासाठी आणि स्वप्नदोषाची समस्या दूर करण्यासाठी एक चमचा वडाचे चिक नियमित दीर्घकाळपर्यंत घेतल्यास फायदा होतो. वडाच्या कोवळया शेंड्यांचे दोन ते तीन ग्रॅम चूर्ण सकाळी पाण्याबरोबर चार ते सहा दिवस वैद्याच्या सल्ल्याने घेतल्यास स्त्रीच्या व्यंधत्वाचे निवारण होते.

**५. कडुलिंब:** खरुज झाल्यास, शरीराला खाज सुटल्यास कडुलिंबाची पाने टाकून पाणी उकळून घ्यावे, नंतर थंड करून त्या पाण्याने अंघोळ करावी. आणि तिळीच्या तेलात कडुलिंबाचा रस टाकून उकळून घ्यावे नंतर ते खाज सुटलेल्या जागी लावावे. हाताला जखम, फोड झाल्यास कडुलिंबाची पाने खारं मीठ घालून कुटावी आणि तुपात तळून तो लेप जखमेवर लावावा. कातडी जळजळ करत असेल तर कडुलिंबाचा रस शरीराला चोळावा.

**६. हिरीड:** पित्ताच्या रोगात साखरेबरोबर हिरड्याचा बारीक चूर्ण मिश्र करून खावे. रक्त वाहत्या घावावर हिरड्याचा अति बारीक चूर्ण दाबून लगेच पाटा बांधावा. दाढेचे दुखणे असल्यास हिरड्याचे बारीक चूर्ण करून खावे.

यांव्यतिरिक्त उंबर, फणस, लसून, लवंग, हरळी, लाजाळू, लिंबू, बोर, मोह/मोहू, गुळवेल अशा अनेक वनौषधी येथील लोकांना परिचित आहेत. असे असले तरी वरील कोणत्याही झाडाच्या फळाचा, पानाचा, फुलाचा, सालीचा किंवा कंदमुळांचा वापर आपण स्वतः घरी करू नये. कारण ही वनौषधी वापरण्याची एक विशिष्ट पद्धत असते. त्याचे एक प्रमाण असते. ओल्या आणि सुक्या वनौषधीचे प्रमाण वेगवेगळे असू शकते. एखाद्या रोगावर एखादी वनौषधी ओली वापरली जात असते तर तीच वनौषधी एखाद्या रोगावर सुकी, कोरडी वापरली जात असते. ह्या गोष्टी आपल्याला माहीत नसल्याने त्याचा विपरीत परिणामही होऊ शकतो. जसे मेडिकल स्टोरवर औषधांचा खूप मोठा साठा तयार असतो. परंतु कोणत्याही डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय त्याचा उपयोग करू नये असा सल्ला दिला जातो. तसेच आपल्या आसपास अनेक वनौषधी असतात परंतु एखाद्या जाणकार व्यक्तीच्या सल्ल्याविना त्यांचा वापर करू नये.

**६. १०. समारोप:**

वरील लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या यांचा अभ्यास करतांना असे लक्षात येते की, या सर्व संकल्पनांचा डांगच्या आदिवासींवर खूप मोठा प्रभाव आहे. या प्रथा, परंपरांचे पालन ते कसोशीने करतात. काही प्रथा या वैयक्तिकरित्या पाळल्या जातात तर काही प्रथा या कुळापुरत्या, जमातीपुरत्या मर्यादित असतात. तर काही प्रथा या गावाच्या, प्रदेशाच्या असतात. त्या त्या वेळी त्यांचे पालन करणे ते त्यांचे कर्तव्य समजतात. बालपणापासूनच या सगळयांचे ज्ञान करून दिले जात असते. बालमनही त्याचे अनुकरण करत असते. त्यामुळे लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या यांची साखळी न तुटता ती अखंडपणे पुढे पिढी दर पिढी सरकत असते. प्रथा, परंपरा, भ्रम, श्रद्धा, विद्या त्यांच्या जगण्याशी निगडीत आहेत. त्यामुळे त्यांचे ज्ञान त्यांना वेळोवेळी त्यांच्या जगण्यातूनच प्राप्त होत जाते. ते कोणी बळजबरीने कोणाला शिकविण्याची गरज नसते. हे ज्ञान सहज आणि सुलभ असल्याने ते त्यांच्या अंतर्मनात जागा करून बसते. हे अंतर्मन त्याला खतपाणी घालत चिरकाल टिकवून ठेवते. ही परंपरा आपल्याला पाच हजार वर्षे मागे घेऊन जाता येते. म्हणजेच सिंधू संस्कृतीच्या काळापर्यंत मागे घेऊन जाता येते. कारण, “सिंधू संस्कृतीतील लोकांचा पुनर्जन्मावर, जादूटोणा, मंत्रतंत्र, भूत यावर विश्वास होता. देवांना प्रसन्न करण्यासाठी त्यांचे पूजन केले जात होते. देवतांना बळी देण्याची प्रथा या काळात दिसून येते. उत्खननात मिळालेल्या मुद्रावर ते दिसून येते. माती, शिंपले, तांब्यापासून तावीजही बनविला जात होता. असे अनेक तावीज उत्खननात सापडलेले आहेत.”[२४] याव्यतिरिक्त चित्रे, शिल्पे, दागदागिने, वजनकाटा, खेळण्या, अग्नीकुंड इत्यादींच्या अभ्यासातून या गोष्टींना अधिक बळकटी मिळते. आजही डांगमध्ये तंत्रमंत्र, जादूटोणा, पुनर्जन्म, भूत यावर विश्वास आहे. येथे अनेक विधींमध्ये बळी देण्याची प्रथा टिकून आहे. अनेकांच्या दंडाला, कमरेला किंवा गळयात तावीज (ताईत) बांधलेले दिसतात. यावरून डांगमधील विविध प्रथा, परंपरा, भ्रम, श्रद्धा, अंधश्रद्धा, विद्या, तंत्र, मंत्र यांना मागील पाच हजार वर्षांची जुनी आणि समृद्ध परंपरा आहे.

*****

**संदर्भ:**


१. लांजेवार लता, वऱ्हाडी बोलीतील लोकसाहित्य: स्वरूप आणि समीक्षा, विजय प्रकाशन-नागपूर, पहिली आवृत्ती: ११ एप्रिल २००३, पृ. २००
२. मांडे प्रभाकर, लोकमानस आणि लोकाचार, गोदावरी प्रकाशन-अहमदनगर, प्रकाशन दिनांक: जानेवारी २०१८, पृ. १११
३. दाभोलकर नरेन्द्र, भ्रम आणि निरास, राजहंस प्रकाशन-पुणे, (प्रकाशन वर्ष नमूद नाही) पृ. ६
४. मांडे प्रभाकर, लोकमानस आणि लोकाचार, गोदावरी प्रकाशन-अहमदनगर, प्रकाशन दिनांक: जानेवारी २०१८, पृ. ५०
५. दाभोलकर नरेंद्र, तिमिरातुनी तेजाकडे: समग्र अंधश्रद्धा निर्मुलन व पुढे, राजहंस प्रकाशन-पुणे, आवृत्ती आठवी: सप्टेंबर २०१८, पृ. १०८
६. वाकोडे मधुकर आणि करोगल सुषमा-संपा., मौखिकता आणि लोकसाहित्य, साहित्य अकादेमी-नवी दिल्ली, प्रथमावृत्ती: २००१, पृ. ९५-९६
७. तत्रैव, पृ. ९५
८. रोंगटे तुकाराम, आदिवासी आयकॉन्स, संस्कृती प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: ४ एप्रिल २०११, पृ. मनोगत १
९. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे अंतःप्रवाह, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, द्वितीयावृत्ती: फेब्रुवारी १९९७, पृ. १२३
१०. वाकोडे मधुकर आणि करोगल सुषमा-संपा., मौखिकता आणि लोकसाहित्य, साहित्य अकादेमी- नवी दिल्ली, प्रथमावृत्ती: २००१, पृ. ९५
११. सावे खंडेराव- अनु. पाटील मीना, वारली: समाजशास्त्रीय अभ्यास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे, द्वितीयावृत्ती: २००७, पृ. ३७-३८
१२. वाकोडे मधुकर आणि करोगल सुषमा-संपा., मौखिकता आणि लोकसाहित्य, साहित्य अकादेमी- नवी दिल्ली, प्रथमावृत्ती: २००१, पृ. ९१
१३. गारे गोविंद, सातपुड्यातील भिल्ल: ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन- पुणे, (आवृत्तीचा उल्लेख नाही), पृ. ६५
१४. लांजेवार लता, वऱ्हाडी बोलीतील लोकसाहित्य: स्वरूप आणि समीक्षा, विजय प्रकाशन-नागपूर, पहिली आवृत्ती: ११ एप्रिल २००३, पृ. २११
१५. सावे खंडेराव- अनु. पाटील मीना, वारली: समाजशास्त्रीय अभ्यास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे, द्वितीयावृत्ती: २००७, पृ. ४८
१६. तत्रैव, पृ. ३७-३८
१७. https://mr.wikipedia.org/wiki/घुबड, दिनांक: ६ जुलै २०२१
१८. लांजेवार लता, वऱ्हाडी बोलीतील लोकसाहित्य: स्वरूप आणि समीक्षा, विजय प्रकाशन-नागपूर, पहिली आवृत्ती: ११ एप्रिल २००३, पृ. २०६
१९. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे अंतःप्रवाह, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, द्वितीयावृत्ती: फेब्रुवारी १९९७, पृ. १२३

२०. दाभोलकर नरेंद्र, तिमिरातुनी तेजाकडे: समग्र अंधश्रद्धा निर्मूलन व पुढे, राजहंस प्रकाशन-पुणे, आवृत्ती आठवी: सप्टेंबर २०१८, पृ. ४८
२१. भोसले द. ता., लोकसंस्कृती: बंध-अनुबंध, पद्मगंधा प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: १ जानेवारी २०१०, पृ. ९१
२२. तत्रैव, पृ. १५६-१५७
२३. वाकोडे मधुकर आणि करोगल सुषमा-संपा., मौखिकता आणि लोकसाहित्य, साहित्य अकादेमी- नवी दिल्ली, प्रथमावृत्ती: २००१, पृ. १००
२४. पाटील अजय अशोक, सिंधू संस्कृती: भारतीय इतिहासातील एक सोनेरी पान, अथर्व पब्लिकेशन्स्-धुळे, प्रथमावृत्ती: सप्टेंबर २०१७, पृ. ४६

**साधन व्यक्ती:**

१. संतुभाई मोतीरामभाई गावित, मु. सुसरदा पो. साकरपातळ ता. वघई जि. डांग.

२. सोमीबेन संतुभाई गावित, मु. सुसरदा पो. साकरपातळ ता. वघई जि. डांग.

३. सुभासभाई मोतीरामभाई गावित, मु. सुसरदा पो. साकरपातळ ता. वघई जि. डांग.

४. लीला सोन्या पवार, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग

५. सितुबेन बबनभाई गवळी, मु. खिरमानी पो. बारखांद्या ता. वघई जि. डांग

६. सोनीबेन चंद्राभाई पालवे, मु. खिरमानी पो. बारखांद्या ता. वघई जि. डांग

७. गोविंद पांडू भोये, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

८. लक्षू गंगाराम पवार, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

९. सिताराम काशिराम पवार, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

१०. गणेश जी. चौधरी, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

११. गंगा आनाजी ठाकरे, मु. बरमेवड पो. घोट्यामाळ ता. आहवा जि. डांग

१२. फुलसिंगभाई एल. पवार, मु. निरगुडमाळ पो. बोरखल ता. आहवा जि. डांग

१३. दिलीपभाई रतन गांगुर्डे, मु. नवागाव पो. सापुतारा ता. आहवा जि. डांग

१४. यशवंत आर. गायकवाड, मु. पासोडीपाडा पो. बोरगाव ता. सुरगाणा जि. नाशिक

१५. सुमन यशवंत गायकवाड, मु. पासोडीपाडा पो. बोरगाव ता. सुरगाणा जि. नाशिक

१६. सिताराम महादू ठाकरे, मु. कुंडाणे (क) पो. अभोणा ता. कळवण जि. नाशिक

१७. यशोदा सिताराम ठाकरे, मु. कुंडाणे (क) पो. अभोणा ता. कळवण जि. नाशिक